# सुशिक्षित आदिवासींसमोरील समस्या

दिनानाथ मनोहर

## समस्यांचे स्वरूप :

भारत स्वतंत्र झाल्यापासून भारतीय समाजातील मागासलेल्या जाती जमातींना विकसित करण्यासाठी शासनाकडून खास प्रयत्न होऊ लागले. विशेषतः गेल्या तीन दशकात हे प्रयत्न परिणामकारक रीतीने अंमलात आणले जाऊ लागले. मागासलेल्या जाती–जमातींचे आर्थिक उत्थापन व्हावे ह्यासाठी विविध योजना आखण्यात आल्या. त्यांना शिक्षण मिळावे म्हणून विशेष प्रयत्न करण्यात आले. ह्याचा परिणाम म्हणून आदिवासींच्या वास्तव परिस्थितीत निश्चितच फरक झालेला आहे. आदिवासींच्या विकासासाठी झालेल्या प्रयत्नांमुळे आणि एकूणच ग्रामीण जीवनात झालेल्या स्थित्यंतरामुळे पूर्वी आदिवासींना ज्या समस्यांना सामोरे जावे लागत असे त्या समस्यांचे स्वरूप आता बदलले आहे. परंतु त्या समस्या आता राहिलेल्या नाहीत असे मात्र नाही. त्या समस्या अजूनही आहेत परंतु आता त्यांचे रूप काहीसे वेगळे झाले आहे. पूर्वी आदिवासींना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध नव्हत्या. आता शिक्षणक्षेत्रांतील सोयी व सवलतीमुळे एक सुशिक्षित पिढी आदिवासींमधून पुढे येत आहे. ह्या पिढीला नव्याच प्रकारच्या समस्यांशी सामना करावा लागत आहे. पूर्वी आदिवासी ज्याप्रकारे शेती करत होता तशी ते आज करत नाही. आता त्यांच्या शेतीयंत्राचे बरेच आधुनिकीकरण झाले आहे. त्यामुळे शेतीत आता त्यांना वेगळ्या प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. आदिवासींतील जमीनधारकांचे प्रमाण कमी होऊन भूमीहीन शेतमजुरांचे, ग्रामीण मजुरांचे प्रमाण वाढल्यामुळे ग्रामीण मजुरांचे नवे प्रश्न पुढे आले आहेत. सुशिक्षित आदिवासींतही बेकार युवकांचा प्रश्न सतावयाला लागला आहे.

ह्या समस्या वेगळ्या स्वरूपात परंतु शिल्लक आहेत ह्याचे एक आणि मुख्य कारण हे आहे की, बिगर आदिवासींचा आदिवासींकडे पहाण्याचा दृष्टीकोन अजूनही बदललेला नाही. आदिवासींचे होणारे शोषण नष्ट झालेले नाही. ह्या शोषणाचे स्वरूप बदलले आहे. हेच ह्या समस्यांमागील कारण आहे. परंतु येथे ह्या अशा समस्यांचे विविचेन न करता केवळ सुशिक्षित आदिवासी युवकांसमोर उभ्या टाकलेल्या समस्यांवर येथे विचार करावयाचा आहे.

आदिवासी युवकांसमोर उभ्या टाकलेल्या ह्या समस्यांचे मुख्यतः दोन विभागात विभाजन करता येईल. ज्या समस्यांना प्रत्यक्ष शिक्षण घेताना तोंड द्यावे लागते अशा समस्या एक प्रकारात, आणि शिक्षण पुरे केल्यावर नोकरी मिळविण्यासाठी वा नोकरी टिकविण्यासाठी येणाऱ्या समस्या, ह्या दुसऱ्या प्रकारात येतील. आजच्या ह्या परिस्थितीत विद्यार्थी म्हणून येणाऱ्या अडचणी आदिवासी विद्यार्थ्यांनाही येतात, परंतु आदिवासी म्हणूनही आदिवासी विद्यार्थ्यांना काही खास अडचणींना तोंड द्यावे लागते ह्या ठिकाणी केवळ शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर पदवी शिक्षणात, पदव्योत्तर शिक्षणात पूर्ण केल्यावर बेकार असताना, व नोकरी काळात येणाऱ्या अडचणींचे विवेचन करण्यात येणार आहे.

## समस्या आणि उपाय :

( १ ) आज असे आढळते की, आपल्या आडनावांचा, आपल्या कुळाच्या नावांचा, आपल्या जातीच्या नावांचा आदिवासी जमातीच्या नावाशी असलेल्या नामसादृश्याचा गैरफायदा घेऊन अनेक बिगर आदिवासी युवक आदिवासी जमातींचे असल्याबाबत खोटी प्रमाणपत्रे घेऊन शैक्षणिक आणि नोकरीच्या क्षेत्रात आदिवासींना मिळत असलेल्या सवलतींचा लाभ घेत आहेत. ही बाब फार गंभीर आहे. आदिवासींच्या जमिनींवर होणारे अतिक्रमण ही जशी गंभीर समस्या आहे त्याचप्रमाणे आदिवासींच्या शैक्षणिक सवलतींवर होणारे हे बिगर आदिवासींचे अतिक्रमण ही सुद्धा गंभीर बाब आहे. अगोदरच विद्यापीठात आणि उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थात पदव्योत्तर विद्यार्थ्यांना मर्यादित जागा असतात, त्यात आदिवासींसाठी राखीव जागा ठराविकच. ह्या जागादेखील जर बिगर आदिवासी बळकावणार असतील तर कसेबसे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पुरे केलेल्या आदिवासी युवकांनी आपला विकास साधावा तरी कसा ?

गेल्या काही महिन्यांपासून शासनाचे आणि इतर आदिवासींचे कल्याण इच्छिणाऱ्या संस्थांचे लक्ष ह्या समस्येकडे

Gulab Sapkal

गेले आहे. शासनाने हा होणारा अन्याय थांबवण्या-साठी काही पावलेही घेतली आहेत. परंतु ह्या बाबतीत ज्या शासकिय अधिकाऱ्यानी अशी खोटी प्रमाणपत्रे जाणून-बुजून दिली असतील त्यांना कडक शासन करणे अत्यंत आवश्यक आहे. खोटी प्रमाणपत्रे देणाऱ्या अधिकाऱ्यांचे तपासून त्यांना गुन्ह्यांबद्दल सजा देणे महत्त्वाचे आहे.

(२) सुशिक्षित आदिवासी पदवीधर युवकांना नोकऱ्या मिळाव्यात म्हणून आदिवासी विकास अधिकारी, आदिवासी विकास महामंडळ अधिकारी हे विशेष कळकळीने प्रयत्न करीत असावेत असे दिसते. किंवा असे म्हणता येईल की ह्या बाबतीत ते काही विशेष करूच शकत नाहीत. ह्यासाठी त्यांना विशेष अधिकार देण्यात यावेत असे वाटते. जिल्हा सेवा योजन कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांकडून राखीव जागांच्या बाबतीत मुलाखतींसाठी कॉल्स पाठविण्यात जाणून-बुजून विलंब लावला जातो अशी नेहमीची तक्रार आहे. जिल्हा सेवायोजन कार्यालय राखीव जागा भरण्या-साठी योग्य वेळी आणि योग्य प्रकारे कॉल्स काढते वा नाही हे तपासण्याचा अधिकार ह्या अधिकाऱ्यांना असला पाहिजे. खरे तर जिल्ह्यात शासकिय कार्यालये व इतर संस्थात जी राखीव पदे आहेत अशा पदांवर आदिवासी/दलीत उमेदवार ह्यांची योग्य प्रकारे नेमणूक होते वा नाही हे जोपासण्यासाठी आदिवासी विकास अधिकारी व आदिवासी विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना हे तपास-ण्याचा खास अधिकार दिला जावा, आणि त्याबाबतीत त्यांना जबाबदारही धरण्यात यावे.

ह्याशिवाय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेत जास्तीत जास्त आदिवासी युवकांनी उत्तीर्ण झाले पाहिजे म्हणून अशा उमेदवारांचे खास शिक्षण वर्गही आदिवासी विकास खात्यातर्फे घेतले जातात. परंतु दुर्दैवाने आतापर्यंत भरपूर पैसे खर्च करून चालवलेल्या अभ्यासवर्गात कोचिंग घेतलेल्या विद्यार्थ्यांनी काही खास प्रगती दाखवलेली नाही. परिणाम असा झालेला आहे की, हे कोचिंग क्लासेसच आता बंद करण्यात आले आहेत. वस्तूतः ह्या कोचिंग क्लासेसचा उपयोग का होत नाही ? आपल्या कोचिंग करण्याच्या पद्धतीतच काही उणिवा राहिलेल्या आहेत का ? असे प्रश्न उपस्थित करून आत्म-परिक्षण करणे गरजेचे होते. ह्याविषयी वेगळा प्रयोग करून पाहण्याची गरज आहे. उदाहरणार्थ ज्या प्रकरणाचा अनुभव आहे, ज्या संस्थेकडे हे कोचिंग देण्यास योग्य असा शिक्षकवर्ग आहे अशा संस्थेकडून असे वर्ग चालविण्याचा प्रयोग करून पहायला काय हरकत आहे ?

( ३ ) ह्या अभ्यासवर्गाचा अनुभव असा असला तरी, एक लक्षात घेतले पाहिजे की, प्रत्यक्ष लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षांना बसणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या सतत वाढत आहे. अशा स्पर्धा परीक्षांना बसणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जाही सुधारत आहे. असे असूनही असे दिसते की, अनेक राखीव जागा ह्या योग्य उमेदवार उपलब्ध नाहीत म्हणून एक तर रिकाम्या ठेवण्यात येतात किंवा बिगर आदिवासी उमेदवारास नेमणूक देऊन भरल्या जातात. ह्याचवेळी असेही अनुभवास येते की, लोकसेवा आयोगाकडून शिफारस झालेल्या आदिवासी उमेदवारांची संबंधित खात्याकडून दखलच घेतली जात नाही. एक तर शिफारस केलेल्या गेलेल्या उमेदवारांना नेमणूक करण्यात एवढा विलंब केला जातो की, घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे जे युवक जास्त काळ बेकार राहू शकत नाहीत असे आदिवासी युवक कुठल्या तरी दुय्यम दर्जाच्या नोकऱ्यांत लागून जातात. कित्येक वेळा खात्या-कडून शिफारस झालेल्या उमेदवारांची नेमणूक करण्याचे टाळण्यासाठी ह्या शिफारसीकडेच दुर्लक्ष करण्यात येते.

ह्याबाबत दोन तीन गोष्टी होणे महत्त्वाचे आहे. एक तर विशिष्ट जागेसाठी ज्या उमेदवारांची शिफारस करण्यात येते, त्यातील एखाद्या उमेदवाराने ही नेमणूक अव्हेरली तर त्याच्या खालोखाल गुणवत्ता असलेल्या उमेदवारास ही नेमणूक दिली जावी.

ठराविक कालानंतर त्या काळात आयोगाने शिफारस केलेल्या आदिवासी उमेदवारांपैकी किती उमेदवारांना नियुक्ती पत्रे देण्यात आली आहेत हे पाहिले गेले पाहिजे.

( ४ ) सहकारी संस्था, निमसरकारी संस्था, शासना-कडून वेगवेगळ्या सवलती घेणारे उद्योग ह्या सर्वांमध्ये राखीव जागा असायला पाहिजे ह्यात काही वाद नाही. पण जेथे आधीच राखीव जागा सवलतीच्या असूनही भरल्या जात नाहीत. त्या जागा भरल्या जाणे गरजेचे आहे. अशा जागा भरण्याबद्दल जे काही नियम आहेत त्यातील पळवाट बंद करून ह्या नियमाचे कडक पालन होऊन, राखीव जागा सर्वच्या सर्व भरल्या जाव्यात हे बघणे आवश्यक आहे.

( ५ ) ज्यांना नोकऱ्या मळाल्या आहेत अशा आदि-वासी नोकरदारांच्या पदोन्नतीबाबतही अशी दिरंगाई व दुर्लक्ष अनुभवास येते. जे लायक नाहीत त्याना पदोन्नती द्या असे कोण म्हणेल ? पण नियमात असेल तर, आणि लायक असेल तर आदिवासी नोकरदाराला उन्नती मिळाली पाहिजे. असे आढळते को जे आदिवासी नाहीत पण ज्यांच्याजवळ आदवासी असल्याची खोटी प्रमाणपत्रे

आहेत अशा बिगर आदिवासींना ज्यात्यात उन्नती मिळते आणि खरा आदिवासी बाजूलाच राहतो.

ह्याबाबत प्रत्येक खात्याचा अखत्यार असलेला एक अधिकारी नेमणे आवश्यक आहे, हा अधिकारी ज्या व्यक्तीबद्दल शंका घेण्यास जागा आहे त्या व्यक्तीची चौकशी सुरू करेल. ह्यासाठी त्या व्यक्तीबद्दल तक्रार यायलाच हवी अशी अट नसावी.

थोडक्यात म्हणजे आज आदिवासींना विशेषतः सुशिक्षित आदिवासी युवकांना ज्या खास सवलती देण्यात येतात त्यांची अंमलबजावणी जास्तीत जास्त चांगली व्हावी असे प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. ह्यासाठी आदिवासी विकासासाठी जी कार्यालये व अधिकारी काम करत आहे त्यांना खास अधिकार देऊन जबाबदार धरले पाहिजे. अशा तऱ्हेचे खास प्रयत्न कल्याण योजनेच्या अंमलबजावणीसाठी झाले नाहीत तर आदिवासी विकास योजना हा केवळ प्रचाराचा आणि प्रसिद्धीचा मुद्दा आहे असे म्हणावे लागेल.

आदिवासींसाठी दिल्या जाणाऱ्या सोयी सवलती आदिवासींना मिळत आहेत वा नाहीत हे तपासण्यासाठी आवश्यक नियम शासनाने केले पाहिजे. पण मुख्य बाब तर ही आहे की, अशा योजना शासन योग्य प्रकारे राबवते वा नाही हे पाहण्याचे काम आदिवासी कार्यकर्त्यांनी केले पाहिजे. आदिवासी नेत्यांचे, आजी व माजी आदिवासी मंत्र्यांचे, आदिवासी कार्यकर्त्यांचे हे काम आहे, ही जबाबदारी आहे. आज आदिवासींमधून जी नवी पिढी तयार होत आहे तिचे काम आहे की, त्यांनी अशी जबाबदारीची पदे सांभाळून आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. त्यांचेच हे काम आहे की, आपल्या नेत्यांकडून त्यांनी ही कामे करून घेतली पाहिजे.

[ पान ११ वरून ]

घेणाऱ्या उच्चपदस्थ कार्यालयापासून तर प्रत्यक्ष आदिवासी विभागात काम करणाऱ्यांपर्यंत जी सुसूत्रता आणि लवचिकता असायला हवी तिचा अभाव होता. विविध प्रकारचे विकासकार्य चालविणाऱ्या व एकाच भागात काम करणाऱ्या प्रशासकीत घटकांमध्ये समन्वय नव्हता व आजही नाही. स्थानिक परिस्थिती आणि गरज पाहून एखादा महत्त्वाचा निर्णय घेण्याची अधिसत्ता त्या विभागातील, उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनाही देण्यात आली असेल तर संबंधित अधिकाऱ्यांनी ते अधिकार वापरण्याची हिंमत केली नाही. एखादे ध्येयधोरण मंत्रालयात ठरविण्यात आल्यावर कार्यान्वित करीत असताना स्थानिक परिस्थितिनुरूप ते निरूपयोगी किंवा हानिकारक वाटले तरी तसे कळविण्याची हिंमत न करता राबविण्यात आल्याचे होकारार्थी प्रतिवृत्त पाठविण्याची प्रवृत्तीच जास्त होती. त्यामुळे नियोजन करणाऱ्यांना अनुभवाश्रित प्रत्यावाहन ( feed-back ) कधीच होऊ शकले नाही.

वरील प्रशासकीय सद्गुण, विकासव्यवस्थेत यावेत यासाठी विकासव्यवस्थेत यथायोग्य प्रवृत्ती आणि पात्रता असलेल्या व्यक्तींची भरती ( Recruitment ) ही आवश्यक बाब आहे हे जरी शासनास ज्ञात असले तरी त्या दृष्टीने पाऊले उचलण्यात आली नाहीत. आरक्षी आणि आस्थापना या परंपरागत पद्धतीच्या कार्यांना ज्या आणि जशा व्यक्ती चालतात त्या आणि तशाच प्रकारच्या व्यक्ती विकासकार्यातही दडपण्याची चूक सतत होत आलेली आहे. वास्तविक अशा प्रकारच्या कार्याबद्दल जिव्हाळा, पूर्वानुभव, अभ्यास आणि पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना, प्रस्थापित नियमाचे जाळे बाजूला सारून, विशिष्ट काळासाठी करार करून या कार्यात घेणे आवश्यक होते. स्वयंसेवी संघटनांमधील व्यक्तींनाही निश्चित काळासाठी घेता आले असते. खाजगी कंपनीच्या भरती पद्धतीमध्ये जी कल्पकता व आक्रमकता असते ती दुर्दैवाने शासकीय भरतीमध्ये येऊ शकली नाही. यापुढे एक पाऊल जाऊन असे म्हणता येईल की, ज्यांच्या विकासाचा हा कार्यक्रम चालविण्यात येतो त्यांच्यातील शिक्षित तरुणांना लहान मोठ्या पदांवर ठराविक काळासाठी घेण्याची योजनासुद्धा शासनाने स्वीकारावी आणि औपचारिक पदवी शिक्षणाची उणीव मधून मधून प्रशिक्षणाद्वारे भरून काढावी. यातून विकास, प्रशासन आणि आदिवासी ह्याच्यात परस्पर विश्वास आणि सहसंवेदना ( Rapport ) निर्माण होण्यास मदत होईल.

विकासासाठी ज्याप्रमाणे आदिवासींनी आपल्या अंधश्रद्धा आणि जुनाट परंपरा यापासून दूर जाणे आवश्यक आहे त्याप्रमाणेच विकास-कार्यक्रम राबविणाऱ्या प्रशासनानेही साम्राज्यशाहीतून वारसाने मिळालेल्या चाकोरीच्या बाहेर जाणे आवश्यक आहे ह्याची दखल घ्यावयास हवी.

[ महाराष्ट्र आदिवासी दर्शनवरून साभार ]
( १ मे १९८६ )

# अनुसूचित जमातींच्या हितरक्षणार्थ घटनात्मक तरतूदी

अनुच्छेद १५ ( ४ ) मधील किंवा अनुच्छेद २९ चा खंड ( २ ) यातील कोणत्याही गोष्टीमुळे नागरिकांपैकी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरिता अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींकरिता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

अनुच्छेद १९ ( ५ ) नुसार भारतीय नागरिकाला भारताच्या कोणत्याही भागात मुक्त संचार करण्याचा, वास्तव्य करण्याचा आणि आणि स्थायिक होण्याचा आणि मालमत्ता संपादन करण्याचा, निर्धारण करण्याचा व विल्हेवाट लावण्याचा मूलभूत हक्क असला तरी कोणत्याही अनुसूचित जमातीच्या हितसंबंधांच्या रक्षणासाठी या हक्कांवर वाजवी निर्बंध घालणारे योग्य ते कायदे करण्याचा अधिकार राज्याला देण्यात आला आहे.

अनुच्छेद २३ ( १ ) नुसार माणसांच्या अपव्यापार आणि वेठबिगारास प्रतिबंध करण्यात आला आहे. या उपबंधाचे कोणत्याही प्रकारे व्यतिक्रमण करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

अनुच्छेद २५ : सद्‌सद्‌विवेक बुद्धीचे स्वातंत्र्य, धर्मपालनाचे व धर्मप्रचाराचे मुक्त स्वातंत्र्य.

अनुच्छेद २९ ( १ ) नुसार भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वतःची विभिन्न भाषा, लिपी वा संस्कृती जतन करण्याचा अधिकार असेल.

अनुच्छेद २९ ( २ ) नुसार राज्याच्या खर्चाने चाललेल्या किंवा राज्याच्या पैशातून सहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेस कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

अनुच्छेद ४६ नुसार राज्य दुर्बलतर जनवर्ग आणि विशेषतः अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करील आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे संरक्षण करील.

अनुच्छेद १६४ ( १ ) नुसार बिहार, मध्य प्रदेश व ओरिसा या राज्यांमध्ये एका मंत्र्याकडे अनुसूचित जमातींच्या कल्याणकार्याचा प्रकार असेल व त्याशिवाय त्याच्याकडे अनुसूचित जमातींचे व मागासवर्गाचे कल्याणकार्य किंवा अन्य कोणतेही काम यांचा प्रकार असेल.

अनुच्छेद २४४ ( १ ) – अनुसूचित क्षेत्रे व अनुसूचित जमाती यांचे प्रशासन व नियंत्रण याविषयी तरतूद.

अनुच्छेद २७५ ( १ ) – एखाद्या राज्यातील अनुसूचित जमातींच्या कल्याण वृद्धीसाठी किंवा त्या राज्यातील अनुसूचित क्षेत्रांची प्रशासन पातळी त्या राज्याच्या उर्वरित क्षेत्रांच्या प्रशासन पातळीइतकी उंचावण्यासाठी ते राज्य भारत सरकारच्या मान्यतेने हाती घेईल अशा विकास योजनांचा खर्च भागविणे राज्याला शक्य व्हावे यासाठी आवश्यक आर्थिक तरतूदी.

अनुच्छेद ३३० – लोकसभेत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता जागा राखून ठेवणे.

अनुच्छेद ३३४ – राखीव जागा व विशेष प्रतिनिधित्व चाळीस वर्षानंतर समाप्त होणे.

अनुच्छेद ३३५ – सेवा व पदे यावर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे हक्क

अनुच्छेद ३३८ नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता एक विशेष अधिकारी असेल व तो राष्ट्रपतीने नियुक्त करावयाचा असेल.

अनुच्छेद ३३९ – अनुसूचित क्षेत्रांचे प्रशासन व अनुसूचित जमातीसंबंधीचे कल्याणकार्य यावर संघराज्याचे नियंत्रण.

अनुच्छेद ३४२ नुसार संविधानाच्या प्रयोजनार्थ अनुसूचित जमाती मानल्या जातील. त्या जमाती किंवा जमाती–समाज अथवा जमाती किंवा जमाती–समाज यांचे भाग किंवा त्यातील गट विनिर्दिष्ट करणे.

अनुच्छेद ३७१ ( क ) – नागालॅण्ड राज्याबाबत विशेष तरतुदी.

( 'वेस्टलॅण्ड न्यूज' फेब्रु.–एप्रिल ८७ आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या पुस्तिकेवरून साभार.)

# धुळे जिल्ह्यातील उद्ध्वस्त आदिवासी गावांची कैफियत

[ धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यात वनाधिकाऱ्यांनी कारवाई करून सुमारे १५० गावे उद्ध्वस्त केली. या घटनेचे पडसाद सर्वत्र उमटले. स्थानिक पातळीवर मोर्चे, निदर्शने तसेच शोषित जन आंदोलनातर्फे मुंबई येथे महाराष्ट्रातील घटक संघटनांच्या वतीने "धरणे" कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यावेळी भेटलेल्या शिष्टमंडळास वनमंत्र्यांनी पुनर्वसनाचे आश्वासन दिले असले तरी अशा घटना ह्यापुढे घडणार नाहीत असे ठामपणे कोण सांगू शकेल ? ह्याउलट शिरपूर ही निव्वळ सुरुवात आहे. पर्यावरणाच्या नावाखाली होत असलेल्या वनीकरणाच्या कार्यक्रमासाठी अशी अनेक गावे उठविण्याची ही नांदी तर नव्हे ना ?

ह्या पार्श्वभूमीवर छात्र युवा संघर्ष वाहिनी व मजुर संघर्ष वाहिनी ह्या दोन संघटनांनी मांडलेली उद्ध्वस्त गावांची कैफियत आपणासमोर ठेवीत आहोत. ]

---

### मागण्या

( १ ) उद्ध्वस्त आदिवासी गावांना पुनः त्याच जागी वसविण्यात यावे. आणि गावाची जमीन महसुलात वर्ग करण्यात यावी.

( २ ) उद्ध्वस्त केलेल्या कुटुंबास ५००० रुपये नुकसान भरपाई द्यावी.

( ३ ) या क्रूर कारवाईस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांना तातडीने निलंबीत करावे.

( ४ ) ही अमानुष कारवाई कुठेही होणार नाही असे स्पष्ट लेखी आदेश संबधितांना द्यावेत.

( ५ ) पडलेल्या सर्व शाळा सरकारी खर्चाने तातडीने सुरू कराव्यात.

( ६ ) वनाधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मालमत्तेची चौकशी करावी.

( ७ ) ॲग्रीसिल्व्ही प्लॉट व ७२ ते ७८ या काळातील अतिक्रमणे तातडीने नावे करावीत.

### शिरपूर तालुक्यातील उद्ध्वस्त केलेल्या गावांची केलेली पाहणी

| | |
|---|---|
| ( १ ) एकूण | ६६ |
| ( २ ) एकूण घरे | ३४४३ |
| ( ३ ) एकूण लोकसंख्या | २११३० |
| ( ४ ) ॲग्रिसिल्व्ही प्लॉट | १२७२ |
| ( ५ ) अतिक्रमित प्लॉट | १२३३ |
| ( ६ ) भूमिहीन | ११०६१ |
| ( ७ ) न तोडलेली गावे | ८ |
| ( ८ ) एम. पी. मध्ये असलेली कुटुंबे | ८७ |
| ( ९ ) ८१ जनगणनामध्ये असलेली गावे | ११ |
| (१०) ७१ जनगणनामध्ये असलेली गावे | १० |

धुळे भागातील सातपुडा पर्वतात वसलेली आदिवासींची गावे वन-विभागाने उद्ध्वस्त केली असून हे आदिवासी उघड्यावर पडले आहेत. ही कारवाई वन-विभागाने डिसेंबर १९८७ च्या पहिल्या आठवड्यापासून सुरु केली. आज एकूण अडीच महिने झालेत. आदिवासींच्या गाऱ्हाण्याची अजूनही दखल घेतली गेलेली नाही.

## नोटीस न देताच गावे उद्ध्वस्त

ही गावे सोडण्यापूर्वी त्या गावांना आम्ही सूचना दिल्या होत्या असे वन-विभागाचे म्हणणे आहे. परंतु हे दिशाभूल करणारे आहे. वन-विभागाचे कर्मचारी, राखीव पोलीसदल यांचा फौजफाटा गावात आला तेव्हाच लोकांना कळाले की आता घरे सोडल्यावाचून गत्यंतर नाही. एखाद्या गावाला कर्मचारी येऊन तोंडी सांगून गेला म्हणून सर-सकट सर्व गावांना तोडण्यापूर्वी सूचना दिल्या होत्या असे म्हणणे दिशाभूल करणारे आहे.

## शंभराच्यावर गावे तोडली

वन-विभागाने शंभराच्यावर गावे तोडली आहेत. त्या पैकी ६७ गावांची पाहाणी " मजूर संघर्ष वाहिनीने " केली आहे. त्या पहाणीचा तक्ता सोबत दिला आहे. मात्र वन-विभागाचे म्हणणे आहे की त्यांनी केवळ ६४ गावे तोडली आहेत. वन-विभागाने ६४ नव्हे तर १०० च्या वर गावे तोडली आहेत व ३० हजारांहून अधिक लोक बेघर झाले आहेत.

## गावे आपणहून उठलीत हे म्हणणे चुकीचे

वन-विभागाने सांगितले आहे की त्याच्या दफ्तरी अस-लेल्या कागदपत्रांनुसार केवळ ११ गावे अधिकृत आहेत. ज्यांच्यावर त्यांनी कारवाई केली. उरलेली अन्य गावे आपणहून लोक सोडून गेलीत. धुळे जिल्ह्याचे जिल्हा अधिकारी श्री. अभय बोरवणकर यांनी सांगितले आहे की कॉलऱ्याची साथ आली असता गावे जशी ओस पडतात तसा प्रकार येथे घडला. तर वन संरक्षक श्री. का. का. चव्हाण यांनी सांगितले की बार उडविला असता जसे झाडावरील सर्व पक्षी उडून जातात तसे एका गावात कारवाई करता अन्य गावे ओस पडू लागली.

## हे दहशतीच्या बळावर घडते

वन-विभागाचे हे म्हणणे पूर्णपणे चुकीचे आहे. वन रक्षक, सशस्त्र पोलीस गावात यायचे, तायडतोब गाव खाली करा म्हणायचे, घरातील भांडीकुंडी तोडायचे, धान्य जप्त करायचे, घरांसाठी वापरलेले लाकूड जप्त करायचे, पैसे-कोंबड्या-बकऱ्यांची लाच मागायचे, कुणी दुर्लक्ष केले तर मारपीटही करायचे. पोलीस, वन-रक्षक रात्री अपरात्री येऊन कारवाई करून जायचे. त्यांचा या दहशतीमुळे सातपुड्याच्या डोंगरात प्रचंड भयाचे वातावरण पसरले. सशस्त्र पोलीस, वन-रक्षक यांच्या हाती धान्य, लाकूड, पैसा, जनावरे पडण्यापूर्वी आपणहूनच घर रिकामे करून स्थलांतरित होणे अधिक व्यवहार्य ठरेल. या भावनेतून व दहशतीतून गावे लोकांनी सोडली.

## कारवाई करण्यापूर्वी लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले नव्हते

वन-संरक्षक यांचे म्हणणे आहे की ही कारवाई करण्या-पूर्वी फार तयारी करण्यात आली होती. कारण ६४ गावे उठवणे सोपे नव्हते. पोलीस, कर्मचारी यांची व्यवस्था करून नंतरच कारवाई करण्याचे ठरले होते. यासाठी मंत्री, आमदार, वन–अधिकारी यांच्या दोन बैठका डिसेंबर महिन्यात घेण्यात आल्या होत्या. या कारवाईची कल्पना लोकप्रतिनिधींना होती.

आमदार हे कबूल करतात की या बैठकांना ते हजर होते. मात्र या भागांमध्ये काम करणाऱ्या " मजूर संघर्ष वाहिनी "च्या कार्यकर्त्यांना या बैठकी व उच्च पातळीवर चाललेली खलबत यांचा मागमूसही नव्हता.

गावातील आदिवासी, स्थानिक संघटनांना विश्वासात न घेताच एकतर्फी कारवाई करण्यात आली. व आता वन–अधिकारी म्हणताहेत की त्यांनी केलेल्या कारवाईची साऱ्यांना कल्पना होती.

## कुणाचा कुणाला पायपोस नाही

ही कारवाई सुरू होताच संघटना, पक्ष यांचे प्रतिनिधी मंत्रालयात वनमंत्री श्री. शिवाजीराव मोघे यांना भेटले तेव्हा शिरपूर भागात वन–विभाग अशी कारवाई करीत आहे हेच त्यांना माहीत नव्हते. तर महसूल विभागातील जबाबदार व्यक्तींकडून असे कळाले आहे कि वन–विभागाने त्यांना न सांगताच कारवाई केली आहे व आता गावांना सांगताहेत की त्यांनी जमिनीवर जावे व महसूल विभागावर जबाबदारी झटकून वन–विभाग बाजूला झाला आहे. वन-विभाग काय करीत आहे त्याची महसूल विभागाला कल्पना नाही. वन–मंत्र्यांना वन- विभाग काय करीत आहे याची कल्पना नाही आणि मंत्रिमंडळ, नोकरशाही काय करीत

आहे याची आमदारांना कल्पना नाही. एकूण वन-संवर्धन, पर्यावरणाच्या नावावर केल्या जाणाऱ्या कारवायांचा कुणाचा कुणाला पत्ता नाही.

## ही आदिवासी गावे अनधिकृत कशी ?

वन संरक्षक श्री. का. का. चव्हाण यांचे म्हणणे आहे की वन-विभागात वसलेली ही गावे अनधिकृत आहेत. त्यांचा दफ्तरात असलेल्या नोंदणीप्रमाणे केवळ ११ गावे अधिकृत आहेत.

" मजूर संघर्ष वाहिनी "ने केलेल्या पाहणी-तक्त्याप्रमाणे अर्ध्याहून अधिक गावे ३० वर्षांपासून वा त्या पूर्वी वसलेली आहेत. १९७१ च्या जनगणना अहवालानुसार १० गावे तर १९८१ च्या जनगणने अनुसार ११ गावे यांची नोंद अहवालात आहे.

परंतु १९७१ पूर्वी या डोंगर भागात शासकीय कर्मचारी गेलेलेच नाहीत. त्यामुळे त्यांची नोंद सरकारी दफ्तरात नसणे याचा दोष कुणाचा ? जी गावे तीस, चाळीस, पन्नास वर्षांपूर्वीची आहेत ती अधिकृत नाहीत असे कसे म्हणता येईल ?

आदिवासींची अनेक मुले अशी आहेत ज्यांचे वय तीस वर्षांहून अधिक आहे ती सांगतात की त्यांचा जन्म अमुक गावी झाला आहे मात्र वन खात्याच्या दफ्तरात त्या गावाचीच नोंद नाही याला काय म्हणावे ?

## गावे वन-जमिनीवर आहेत हे म्हणणे चुकीचे आहे

वन-अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की त्यांना वनाचा विकास व संवर्धन करायचे आहे व त्यासाठी ही गावे वन-जमिनीवरून काढून टाकण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले आहे.

ही गावे वन-जमिनीवर वर्षानुवर्षे वसली आहेत. त्या घरांच्या वा गावाच्या नावे जमिनीचे पट्टे कायदेशीरपणे देण्याची कार्यवाही आधीच व्हायला हवी होती. ही कार्यवाही आधी केली गेली नाही व म्हणून ती गावेच अनधीकृत आहेत असे म्हणणे तर्कसंगत नाही. ही गावे ज्या जमिनीवर वसली आहेत. त्या जमिनीला गावठाण वा महसूल जमिनीत वर्ग करणे आवश्यक होते. ती पूर्वी वर्ग केली गेली नाहीत म्हणून आताही वर्ग करणार नाही हे वन-विभागाचे म्हणणे कोणताही आदिवासी मान्य करणार नाही व करीतही नाही.

## गावे त्याच जमिनीवर वसवावी

जी गावे त्या जमिनीवर होती त्याच जागेवर पुनः वसविण्यात यावीत ही आदिवासींची आज मागणी आहे. गावे जर वन-जमिनीवर आहेत तर त्या वन-जमिनीला महसूल जमिनीत वर्ग करावे. व केवळ १९८०च्या वन-कायद्याचा बागुलबुवा उभा करू नये अशी मागणी आदिवासी करीत आहेत.

## १९८०चा वन कायदा काय आहे ?

१९२७ साली ह्या वन-कायद्यात १९८० साली केंद्र शासनाने सुधारणा केली आहे. या सुधारणेप्रमाणे सारी जंगल जमीन केंद्र शासनाच्या अखत्यारीत आली आहे. जंगल जमिनीवर एखादे काम करायचे असेल तर केंद्र शासनाने परवानगी द्यावी लागते. राज्य-शासनाचा आदेश तेथे कामाचा नाही.

या सुधारणेमुळे वन-जमीन गावठाण जमिनीत वर्ग करता येणार नाही. अशी वन-विभागाची भूमिका आहे.

## गावांना महसूल जमिनीवर हलविणे

वन-विभागाने ती गावे त्याच जागेवर वसविण्यास नकार दिला आहे. त्या गावांना गावठाण जमिनीवर वा महसूल जमिनीवर आम्ही वसवितो असे कलेक्टर व वन-अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. जंगल-जमिनीला लागून जी महसुलाची जमीन आहे त्यावर गावे वसविण्याची योजना वन-विभागाने योजली असून त्या प्रमाणे नकाशा बनविला आहे.

## वन जमिनीवरील गावे अविकसित

जमिनीवर वसलेली गावे अनधिकृत आहेत व त्यामुळे शासनाच्या विकासाच्या योजनांचा लाभ त्या गावांना वा त्या आदिवासींना मिळू शकत नाही. जर ती गावे महसूल-जमिनीवर आली तर साऱ्या योजनांचा लाभ त्यांना होईल. ही बाजू वन-अधिकारी आज मांडत आहेत.

## गावांचा संबंध अतिक्रमित जमिनीशी आहे

गावे तोडल्यामुळे केवळ त्या गावांना वसविण्याचाच प्रश्न उद्‌भवला नसून त्यांनी वन-जमिनीवर अतिक्रमण करून ज्या जमिनी लागवडीखाली आणल्या आहेत त्या जमिनींचा प्रश्न देखील वरील प्रश्नाशी निगडीत आहे.

लागवडीखाली आणलेली बहुतांश अतिक्रमित जमीन ही गावांच्या मूळच्या जमिनीला लागून आहे. जर ही गावे जंगल-जमिनीच्या परिघाच्या बाहेर नेतील तर कसण्यासाठी या आदिवासींना आपल्या शेतावर जाणे प्रचंड जिकिरीचे होईल हे अव्यवहार्य आहे.

## शेतीचे पट्टे देऊ याला आधार काय ?

वन अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की महाराष्ट्र शासनाने काढलेल्या जी. आर. ( शासकीय आदेश ) अनुसार १९७२ ते १९७८ साल या दरम्याने कसल्या जाणाऱ्या जमिनीचे पट्टे त्यांच्या नावे करण्यात येतील. या जी. आर. अनुसार ज्या व्यक्ती पात्र असतील, त्या व्यक्तींना महसूल जमिनीला लागून असणाऱ्या वन-जमिनीवर पर्यायी शेतीचे पट्टे देऊ.

जे वन-खाते व महसूल खाते आज अतिक्रमित शेतीची जमीन "शासकीय जी. आर. अनुसार कसणाऱ्याच्या नावे करू शकले नाही. ते खाते कसण्यासाठी वन-जमिनीचे पट्टे नावे नावे करून देतो म्हणत असले तरी त्यावर विश्वास कसा ठेवावा ?

## कायद्या प्रमाणे पट्टे द्याल ?

याबाबत अधिक चर्चा वन-अधिकाऱ्यांशी केली असता त्यांना प्रश्न विचारण्यात आला की ज्या मूळ जागेवर गावे आहेत ती जमीन गावठाणात वर्ग करणे कायद्या अनुसार शक्य नाही तर मग वन-जमिनीचे पट्टे कायद्या अनुसार शेत-जमिनीत वर्ग करू या म्हणण्याला आधार काय ?

वन अधिकारी यांनी यावर सांगितले की गावठाणासाठी वन-जमीन " वन-विरहित " ( डी. फॉरेस्ट ) करता येत नाही. मात्र शेतीसाठी वन-जमीन " वन-विरहित " करता येते.

## वन–विभागाने केंद्रशासनाची मान्यता मिळवावी

१९८० मध्ये वन कायद्यात झालेल्या सुधारणेनुसार वन-जमिनीला शेत-जमिनीत वर्ग करायचे असेल तर त्याचा अधिकार केंद्र शासनाला आहे. वन-विभागाने महाराष्ट्र शासनाचा याबाबत आदेश मिळविलेला नाही. जर उद्या महाराष्ट्र शासनानेच हात झटकले तर वन-विभागाच्या पर्यायी शेत–जमीन देण्याच्या योजनेचे बारा वाजतील. आणि जर का महाराष्ट्र शासनाने या योजनेला मान्यता दिली तरी केंद्र शासन मान्यता देईलच असे नाही.

## आदिवासी उघड्यावर पडेल

याचा परिणाम आदिवासींवर होईल. जी जमीन तो आज कसतो आहे ती तर त्याच्या हातातून जाईलच आणि जी जमीन बदली म्हणून वन-खाते देणार आहे ती जमीन त्याच्या नावे होईलच याची शाश्वती नसल्याने वन-खाते पुनः त्याला हुसकावणारच नाही असे कसे म्हणावे ?

## फिजिकली ट्रान्सफर करू

वन विभागाचे यावर उत्तर असे आहे की बदली शेत जमीन त्या आदिवासीच्या नावे 'फिजिकली ट्रान्सफर' करून ते देतील. मात्र 'लिगली-ट्रान्सफर' आताच करून देता येणार नाही. वन-खाते देखील हमी देण्यास तयार नसेल, जर-तरची भाषा करीत असेल, तर हातचे सोडून पळत्यापाठी लागण्याचा वेडेपणा आदिवासींनी का म्हणून करावा ?

## ॲग्रेसील्व्ही प्लॉटचा प्रश्न

या भागात ॲग्रेसील्व्ही प्लॉटचा प्रश्नही मोठा आहे. वन-खाते रोपे लावलेल्या जमिनीचे तुकडे आदिवासींना द्यायचे. त्या जमिनीच्या तुकड्यावर त्याने रोपांच्या मध्ये राहणाऱ्या मोकळ्या जमिनीवर शेती करायची आणि सोबत रोपांची निगराणी करायची. हा जमिनीचा तुकडा केवळ पाच वर्षांसाठी दिला द्यायचा. मुदत संपली की वन-खाते दुसरा तुकडा द्यायचे. या प्लॉटला 'ॲग्रेसील्व्ही-प्लॉट' असे म्हणतात. १९७२ ते १९७९ च्या दरम्यानचे ॲग्रेसील्व्ही प्लॉट महाराष्ट्र शासनाचा आदेश निघूनही आज पर्यंत आदिवासींच्या नावे करण्यात आलेले नाहीत.

## आज आदिवासी माळरानावर पडला आहे

गावे उद्‌ध्वस्त केल्यावर हे लोक महसूल जमिनीवरील खाजगी मालकाच्या शेतीवर बसले आहेत. काही ठिकाणी या लोकांनी खाजगी शेत मालकाशी करार केला आहे. ज्या जमिनीवर पूर्वी गावे होती तेथील विहीर वा हॅन्ड पंपाचाच उपयोग हे लोक करीत आहेत. यासाठी मैलोगणती चालत जावे लागत आहे. तर काही ठिकाणी खाजगी शेत मालकांनी या लोकांपुढे तगादा लावला आहे की त्यांनी त्यांचा जमिनी मोकळ्या कराव्यात. बाधपाड्यातील लोक सांगत होते की त्यांचा ताट्या ( बांबूच्या चटया ) मोडल्या वर पुनः विकत कसे घेणार ? जंगलात बांबू देखील नाही की पुनः नव्या ताट्या बनविता येतील.

## घर तोडणे म्हणजे केवळ छप्पर हिरावून घेणे नव्हे

घर म्हणजे केवळ चार भिंती नसतात. घरांचा समूह म्हणजे केवळ राहाण्याची वस्ती नसते. समूहांची आपली संस्कृती असते. भावनिक संबंध असतात. समूहजीवनाचे मानवशास्त्र एकविसाव्या शतकात जाण्याच्या बाता करणाऱ्या शासनाला मात्र कळत नाही.

[पान ५९ वर पाहा

वनखात्याकडून निलगिरीच्याच बियाणाचे सढळ हस्ते वाटप होत आहे. निलगिरी हे असे झाड आहे की जे क्वचितच सामाजिक वनीकरणाचे उद्दिष्ट पुरे करू शकेल. एक टीकाकार म्हणतो, निलगिरी हे पर्यावरणीय भय आहे. ते ना जळण पुरविते ना चारा, ना देत सावली ना पालापाचोळा त्याऐवजी ते पाण्याची पातळी मात्र खाली नेते. स्थानिक लोक हॉन्ज ( honge ) जातीची लागवड पसंत करतात. त्याचे लाकूड जळणासाठी जास्त चांगले समजले जाते. आणि त्यांचे बीयापासून मिळणाऱ्या तेलाचा औषध व इतर गोष्टींसाठी उपयोग होतो. परंतु हॉन्जचे बियाणे वन विभागाने केव्हाही वाटप केले नाही.

अन्नधान्य पीकासाठी लागणाऱ्या मजुरांपेक्षा निलगीरी लागवडीच्या कामात कमी मजुर लागत असल्याने शेतकरी मजूरांवर कमी अवलंबून राहतो. सामाजिक वनीकरण योजनेंतर्गत शेती ऐवजी नव्हे तर शेती कार्यक्रमाला जोड म्हणून असे कार्यक्रम घेतले तरच ग्रामीण रोजगारात वाढ होईल.

कर्नाटकप्रमाणेच तामीळनाडूच्या SIDA ने अर्थसहाय्य केलेल्या योजनेतर्गत गावातील सामाईक गुरचराईच्या जागेवर आता ७५% निलगिरीची लागवड केली जाणार आहे.

उत्तर प्रदेशमधील गढवाल टेकड्यांवर होत असलेल्या वनीकरणांतर्गत निसर्गतः वाढणाऱ्या, रुंद पानाच्या, दरवर्षी पाने गळणाऱ्या झाडांच्या ओक, अश, पांजर, सौद या जातींऐवजी औद्योगिक व व्यापारी उपयोगाच्या देवदार व मलबारीसारख्या झाडांची लागवड केली जात आहे. ह्या रुंद पानांच्या झाडामुळे जमीन अधिक उपयुक्त बनते व पावसाचे पाणीही धरून ठेवण्यास ही झाडे मदत करतात तर नवीन झाडे पर्यावरणीय दृष्ट्या उपयुक्त नाहीत. नवीन जातीची झाडे जगण्याचे प्रमाणही फार कमी आहे. मनराल धोतीदार विभागात १९७४–७५ मध्ये लावलेल्या ६०६ देवदारांपैकी फक्त १५८ जंगले तर २०६० मलबारी पैकी ६० झाडे जगली. ह्याऊलट १९७७-७८ मध्ये लावलेल्या ६२५० ॲश रोपांपैकी ६०५० रोपे जगली. व्यापारी उपयोगाच्या झाडांपासून स्थानिक लोकांना काही फायदा मिळणार नसतो त्यामुळे साहजिकच अशा वनीकरणाचे प्रयत्न अयशस्वी ठरतात.

मध्य प्रदेशमधील बस्तर जिल्ह्यात सामाजिक वनीकरणाखाली पाईनच्या एकजातीय लागवडीला मोठा विरोध झाला. बिहारमध्ये सालऐवजी सागाची एकजातीय लागवड येथील आदिवासींनी उखडून टाकली.

ह्या सर्व स्थितीमुळे सामाजिक वनीकरण कार्यक्रमातील लोकांच्या सहभागाबद्दल मोठा प्रश्न उभा राहतो. सामाजिक वनीकरणाच्या ( १ ) गावजमिनींवर वृक्षनिर्मिती, ( २ ) वनशेती ( ३ ) स्ट्रीप लागवड ह्या तीन प्रमुख घटकांपैकी पहिल्या दोनांसाठी तर निश्चितच समाजाच्या सहभागाची गरज आहे.

असा समाजाचा सहभाग एकतर लोकांचे शिक्षण करून, त्यांना ह्याकामासाठी प्रवृत्त करण्याच्या मार्गाने किंवा त्यांना काही लाभ देऊन मिळविता येईल. स्वयंसेवी संघटना पहिल्या मार्गाचा अवलंब करताना दिसतात तर सरकारी यंत्रणा दुसऱ्या मार्गाचा.

## गुजराथमधील प्रयत्न

गुजराथ सरकार वनीकरण कार्यक्रमात मजुरांचा सहभाग मिळावा म्हणून नवनवीन मार्ग अवलंबीत आहे. ह्या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या मजूर कुटुंबाला सरकार ' निर्धूर चूल ' देते. जिच्यामुळे इंधनातही बचत होते व धुराच्या त्रासापासूनही बचाव होतो. वनीकरण कार्यक्रमासाठी ज्या गावातून मजूर मिळतात त्या गावांना ' विटांच्या दफनभूमी ' बांधून देण्याचे काम वनविभाग करते. उघड्या जागी दफनासाठी जेवढी लाकडे लागतात त्याच्या निम्म्यानेच येथे लाकडे लागतात.

निकृष्ट जंगलात किंवा जंगलाशेजारी असलेल्या गावातील लोकांना त्यांनी ह्या निकृष्ट जंगल जमिनींवर फळे चारा जळाऊ लाकडांची लागवड करावी म्हणून सरकार प्रोत्साहन देते.

तामीळनाडूतील प्रकल्पांतर्गत कुटुंबाला जळण, लहान लाकडे, चारा व ५०० फळाच्या जातींचे बियाने मोफत पुरविण्याचा लाभदायी कार्यक्रम सुरू आहे. जगलेल्या झाडांवर रोख रक्कमही वर्षअखेर दिली जाणार आहे. ५ वर्षाअखेर ह्यामुळे १ लाख कुटुंबांना फायदा होईल व त्यासाठी १·४३ कोटी रुपये खर्च होईल. स्त्रियांचा सहभाग असलेल्या स्थानिक कार्यकर्त्यांचा संचही उभा करण्याची तामीळनाडूची योजना असून हा संच सामाजिक वनीकरण योजना चालविण्यासाठी लोकांना प्रवृत्त करून प्रशिक्षित करेल.

ह्या उलट स्वयंसेवी संघटना रोख पैशाचा लाभ देऊन लाभार्थी मिळवू इच्छित नाहीत. १९७३ मध्ये ज्यांनी चिपको आंदोलन चालविले त्या उत्तर प्रदेशातील चमोली जिल्ह्यातील दशौली ग्राम स्वराज्य संघाला वनीकरण कार्य-

[ पान ६३ वर पाहा

# पश्चिम घाट बचाव मोहीम

**श्री गुलाब सपकाळ**

श्री. शहाजी हायस्कूल, सुपे ता.
बारामती जि. पुणे.पीन-४१२२०४

---

नव्वद दिवसांच्या पायी प्रवासात अनेक बरेवाईट अनुभव अनुभवायला मिळाले. नवे प्रदेश, नवी गावे तसेच नवनवी माणसे-असे बरेचकाही मनात घर करून बसले आहे. वनात राहणारा आदिवासी नवखा जरी नसला तरी इतक्या जवळून पाहण्याची संधी 'पश्चिम घाट बचाओ' मोहिमेच्या निमित्ताने मिळाली.

सदानकदा वाकलेला, रोज नवा दिवस जन्माला घेऊन येणारा, हा माणूसच का? असा प्रश्न पडतो. अत्यंत कष्टाचे जीवन, तुटपुंजे अन्नधान्य अर्थात जमीनही तशीच आणि शिक्षण, आरोग्य, सवलती इ. सारेच त्याच्यापर्यंत कधीही वेळेवर न पोहोचलेले! धान्य पिकले तर डुकरे, वांदरे आणि आता गवे नासधूस करतात, त्यांना मारावे तर अभयारण्य! रानात काही हिरडा, डिंक, शिकेकाई वा! अन्य गौण उपज गोळा करावेत तर त्यातही अनंत अडचणी. इकडून तिकडून हिरडा गोळा केला तर व्यापारी पाडून मागतो. आणि अशावेळी सोसायट्या सुरू होतात, तेव्हा फक्त व्यापाऱ्याकडेच हिरडा असतो. अशा पद्धतीने व्यापारी मंडळी घरबसल्या नफा कमवायला चटावलेले आहेत. हेच खरे लांडगे आहेत.

शिमगा संपताच पाण्याची बोंब सुरू होते, वनात राहून पाणी नाही असते ते अत्यंत दुर्गम ठिकाणी, त्यासाठी अर्धाधिक दिवस वाया जातो. भिमाशंकर परिसरात कोंढवळ आहुपे आणि तुंग ही तीन गावे अगदी बोलकी उदाहरणे आहेत. एका ठिकाणी प्रस्तराहोण, दुसऱ्या ठिकाणी चार-पाच किलोमिटरची भटकंती तर तिसऱ्या ठिकाणी त्याही पलीकडचे-तुमच्या आमच्या आवाक्या बाहेरचे! काही ठिकाणी रस्ता, वीज, रेशनिंग कार्डस आणि टपाल या बाबी अद्यापही आदिवासींच्या ओळखीच्या व्हायच्या आहेत, आणि असं काही सारं सहन करीत असलेल्या माणसाला जंगलतोड्या म्हणून, त्याच्यावर आरोप केला जातो.

ना त्याचेजवळ बैलगाडी, नाही त्याचेजवळ लॉरी, मग तो जे तोडतो ते त्याच्या पोटासाठी आणि चुलीसाठी, सॉ मीलसाठी नव्हे! काही ठिकाणी त्याचे घराजवळून रस्ता जातो पण त्या रस्त्याने बस धावत नाही, शिक्षक जात नाहीत, डॉक्टर अथवा शेतकी मदतनीसही जात नाहीत. या रस्त्यावरून कोणत्या आदिवासींचे ट्रक जातात? गावोगावी आणि शहरांतून कोळसा आणि टिंबर दुकानदार थाटात जीवन जगताना दिसतात. जंगल व्यवसाय मोठा किफायतशीर धंदा आहे, हे कोणीही मान्य करील, पण दुर्दैवाने, आज रोजी एकही आदिवासी श्रीमंत बनलेला दिसत नाही.

बनात राहाणाऱ्या माणसाला वनाबद्दल व वन्यजीवाबद्दल आत्यंतिक प्रेम असते. कारण त्यांचे तेच खरे जीवन होय. लहानपणी मुलांबरोबर रानात भटकायचो. जांभळे, करवंदे आणि बोरे यांची चांगलीच गोडी लागली होती. त्यांचे तुलनेत क्षमता आणि अर्थातच प्रेम कमी असल्याने, मी हातात सापडलेली फांदीच मोडून घेई. अशाप्रसंगी ही आदिवासी मुले मला चांगलीच डाफरीत ती गोष्ट मला आता कळू लागली आहे. त्यांनी कधी खिसे भरले नाहीस मात्र खात भरपूर असत. मोहिमेतही याहून भिन्न पाहायला मिळाले नाही. यातून केवळ झाडावरचे प्रेमच सिद्ध होते. उतारवयाला लागलेला शरीराची खारीक बनलेला पाणखेड्याचा पिन्या तर अक्षरशः वेडाच बाटावा, इतका झाडासाठी मरमर मरतो आहे. गेल्या पाचसात वर्षांपासून स्वतःच्या मालकी हक्काचे नसणारे डोंगर क्षेत्र सांभाळून एक आदर्श उभा करीत आहे. एवढ्या अल्पकाळात आजपर्यंत सरकारला जे कुठेही करून दाखविता आले नाही, ते त्या भिल्लाने एकट्याच्या हिंमतीवर साध्य केले आहे. त्याने सांभाळलेल्या जंगलक्षेत्रालगत त्याच्या जमिनीत पूर्वीपेक्षा दुप्पट उत्पन्न मिळवीत आहे. त्यामुळे त्याच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि समाधान आणि सुख केवळ पिन्या भिल्लाकडेच पाहायला मिळते.

इथून जवळ असणाऱ्या वाकीकीलाही असाच प्रयोग चालू आहे. आहुप्याची देवराय आजही टिकून आहे. यात कुसूमच्या पाटीशी इतरांबरोबर स्थानिक माणसेही होती. आकाशवाणी दूरदर्शन इथपर्यंत जाऊन पोहोचले तर यांचे जंगलप्रेम जगाला कळेल ना? त्यांना इंदिरा वृक्ष मित्र पुरस्कार मिळाला तर?

अर्ध्या कोट लोक संख्येपैकी जास्त संख्येने आदिवासी आपले जीवन सह्याद्रीत अतिशय अवघड आणि वाईट परिस्थितीत कंठत आहेत. मी तर असे म्हणेन की जिथे आदिवासी आहेत तिथेच वने टिकून आहेत, हे दोन

हजार किलोमीटरच्या प्रवासात स्पष्टच दिसत होते, अगदी गोव्यापर्यंत !

आदिवासी आणि वनांचे नाते प्रेमाचे अथवा जिव्हाळ्याचे असले तरी वनखाते आणि आदिवासी मात्र आपणाला बऱ्याच वेळा कोड्यात टाकतात. पश्चिम घाटात हे नाते कोठेही खेळीमेळीचे दिसले नाही. वनखात्याच्या उपस्थित लोकांसमोर हे आदिवासी कधीच मनमोकळेपणाने बोलत नसत. त्यांना तसे आवाहन करूनही त्यात विशेष फरक पडत नसायचा. पण जेव्हा हे आदिवासी स्वतंत्रपणे आमच्याशी बोलत, त्यांच्या अडचणी सांगत तेव्हा ते खुलून बोलत. काही प्रसंगी ही माणसं उपस्थित वादाच्या विषयावरून वनकर्मचाऱ्यांशी हमरीतुमरीवर येत. गोव्याला पोहोचेपर्यंत वनकर्मचारी आणि आदिवासी यांच्यातील दरी-अंतर जवळ येताना दिसलेच नाही.

कोंढवळच्या एका संयुक्त सभेत आरोपप्रत्यारोप होऊन सभा संपली. तथापी त्यातून जे अनुत्तरित राहिले ते आजही मनात तसेच घर करून आहेत. एकंदरीत अनुभवावरून एकच सरळ आणि सोपामार्ग आहे तो म्हणजे आदिवासी आणि वनखाते यांच्यात सहकार्याचे आणि सांमजस्याचे संबंध प्रस्थापित व्हावेत. जोपर्यंत वनखाते आणि वनात राहाणारा माणूस आपलेपणाने जवळ येत नाहीत तोपर्यंत भारतीय वनांचे काही खरे नाही. यासाठी सरकार, विविध सामाजिक संस्था, कार्यकर्ते, आदिवासी आणि वनखाते या सर्वांनी एकत्र येऊन वने आणि आदिवासी यांच्यामध्ये जे नाते, संबंधप्रेम आणि जिव्हाळा आहे अगदी हेच आदिवासी आणि वनखाते यांच्यात प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. माझ्या अल्प अनुभवानुसार मी असे म्हणेन की वनखात्याने पुढे हात करून, त्यांना विश्वासात घेऊन, त्यांच्या सहकार्याने वनांची जोपासना करण्यातच खरे हित आहे. जोपर्यंत हे शक्य होत नाही तोपर्यंत हा विषय पर्यावरण भरभराट अथवा कल्याणाच्या गोष्टी कागदावर राहातील.

पश्चिम घाट आणि परिसरात वेगवेगळ्या संस्थांमार्फत वनीकरणाचे व वनजोपासण्याचे काम मोठ्या प्रमाणावर हाती घेतलेले दिसले. मात्र कार्य आणि त्याचे यश यातील फरक जागोजागी स्पष्ट जाणवला. विशेषतः वनखात्याचे प्रयत्न निष्फळ ठरलेले दिसले. कोयना पाणलोट क्षेत्रात कोयना अभयारण्याच्या जवळच जेव्हा निलगिरीचे कुप दिसतात तेव्हा वनखात्याच्या कार्याची आणि ज्ञानाची कीव येते. त्यांच्या सांगण्यावरून सुमारे पंधरा ते तेवीस वय वर्षांची निलगिरी आणि एका सामान्य आदिवासी भिल्लाने सात-आठ वर्षांचे जोपासलेले नैसर्गिक जंगल या दोन गोष्टींतील फरक बरेच काही सांगून जातो.

महाराष्ट्र वनविकास महामंडळाने जे काही वनविकासाचे प्रयत्न केले ते निश्चित आशादायक नाहीत. एखादाच प्रकल्प डोळ्यात भरण्यासारखा दिसतो अर्थात तोही सागाचा इतरत्र मात्र वनविकास महामंडळाने आपल्या नावाची बदनामी करून घेतली आहे. धुळे आणि नाशिक या भागात या मंडळाने ज्या वेगाने मौल्यवान जंगल तोडून तथाकथित जंगलाचे आरोग्य सांभाळण्याचा प्रयत्न केला ( ? ) तसा प्रयत्न नवीन जंगल उभारण्यास अजिबात केलेला नाही. हे त्यांचे अपयश खपून जाण्यासारखे नाही. त्याचे परिणाम आणि पडसाद चव्हाट्यावर आलेले आहेत. येत आहेत.

पश्चिम घाट विकास योजनेने त्या भागातील माणूस व त्याचे पर्यावरण आणि जीवनमान सुधारण्याचा संकल्प केलेला आहे. नालबंडीग, टेरेसिंग, कुरण विकास, आंबा लागवडीसारखे त्यांचे प्रयत्न जागोजागी मोठ्या प्रमाणावर दिसून येतात–ते जेव्हा आपण उघड्या डोळ्यांनी, खोल शिरून पाहातो तेव्हा त्यांचा तकलादूपणा लक्षात येतो. त्यांची ही कामे कुणासाठी ? कोठे ? आणि कशी ? या प्रश्नांची उत्तरे अनुक्रमे पाटील सरपंचांसाठी अनावश्यक ठिकाणी आणि अनियोजनाबद्ध हे स्पष्ट जाणवते दिसते.

कोल्हापूर जिल्ह्यातील सावर्डे गावी शेतकऱ्यांनी स्वतः केलेले टेरेसिंग आणि विकास योजनेतर्गत अन्यत्र झालेले टेरेसिंग पाहिल्यावर खरे काम शेतकरीच करू शकतो, असे दिसते. ओतूर, खिरेश्वर दरम्यान जो कुरण विकासाचा प्रकल्प हाती घेतला आहे तो पाहिल्यावर असे वाटते की तिथल्या माणसाचा त्यांच्या जनावरांचा आणि घाटाचा खरेच विकास होईल का ?

अलीकडील काही वर्षांत सामाजिक वनीकरण नावाचे खाते वनीकरण, त्याचा प्रचार आणि प्रसार करीत आहे. या खात्याची अनेक ठिकाणी कामे पाहावयास मिळाली, पण केवळ अंजनावळे वगळता इतरत्र कोठेही भरीव स्वरूपाची कामे दिसून आली नाहीत. इतरत्र कामे आहेत पण यश मात्र शून्य ! या अपयशाची खोल माहिती मिळविल्यावर त्यांचा संपर्क, सहकार्य, कामसुपणा, आत्म-विश्वास इ. गोष्टी कमी पडतात. हे आपलं आहे, आपल्या भल्यासाठी आहे, आणि आपल्या देशासाठी आहे ही भावना कुठे दिसूनच येत नाही.

सामाजिक वनीकरणातील दुसरी एक महत्त्वाची गोष्ट


पश्चिम घाटात राहणाऱ्या माणसाला खटकू लागली आहे. ती निश्चितच विचार करायला भाग पाडणारी आहे. हे लोक निलगिरी, ऑकेशा, सुरू यांसारखी झाडे स्वीकारायला तयार नाहीत. त्यांना चारा देणारी घर आणि अवजारा-साठी लाकूड देणारी, सरपण देणारी; फळे देणारी आणि गौणउपज देणारी झाडं हवी आहेत. आंबा, फणस, सादडा कैंजळ, हिरडा या झाडांबाबत स्थानिक माणसाला जी माया आहे, दिसते तशी झटपट वाढणाऱ्या झाडांबाबत आढळली नाही. हा नवीन विचार सरकारने लवकरात लवकर स्वीकारून त्यांच्या गरजा, इच्छा आणि आकांक्षा इ.ची कदर करून केवळ पैशाच्या मागे न लागता पर्यावरण आणि गरजा यांचा मेळ घालणे अगत्याचे आहे नाहीतर गुरेढोरे, शेळ्यामेंढ्या, वन्यजीव यांचेबरोबर माणसाचेही अस्तित्व धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. आपणा सर्वांना केवळ वने नकोत केवळ पैसा नको; आपणा सर्वांना हवे आहे सार्वत्रिक कल्याण-निसर्ग संतुलन !

पश्चिम घाटामध्ये विविध सामाजिक संस्था समाजोपयोगी कामे हाती घेऊन स्थानिक माणसाचे जीवनमान उंचवण्याचा प्रयत्न करीत आहे. कशेळयाची ए. डी. एस., देवरुखचे मातृमंदिर मोरवाड्याचे प्रगतिप्रतिष्ठान, पवनेची जीवन, निर्मिती, तारा आणि कर्मा इ. संस्था आपल्या कुवतीने सामाजिक विकास आणि निसर्ग संतुलनासारखी कामे हाती घेऊन एक आदर्श उभा करीत आहेत. दुर्मिळ औषधी वनस्पतींचे जतन, वैदू प्रशिक्षण, स्थानिक फळ झाडापासून विविध व चांगले पदार्थ, बांबूपासून रोजच्या वापरातील आकर्षक पण स्वस्त वस्तू आणि औषधोपचार इ. मान-वाच्या गरजा हाती घेऊन ए.डी.एस. आपले नाव उज्ज्वल करीत आहे.

पवना धरणाने उद्‌ध्वस्त केलेल्या माणसाचे जीवन सांभाळण्याचा प्रयत्न 'जीवन' संस्थेने हाती घेतलेला आहे. देवरुखचे मातृमंदिरही अशा कामी मागे नसून गोकुळ गृह चालवून खरे जीवन जगण्याचे मार्ग आणि दिशा देत आहेत तर भीमाशंकर भागात आदिवासींसाठी कुसुम आणि आनंद मायबाप बनले आहेत. या आणि इतरही अनेक संस्थांची कामे पाहिल्यावर आणि सरकारी कामे पाहिल्यावर ही सरकारी कामे माणसासाठीच आहेत का, असा प्रश्न पडतो. यासाठी सरकार आणि अंमलबजावणी करणारे यांनी आपले ' सरकारी ' धोरण बदलणे आवश्यक आहे.

सह्याद्रीच्या पदयात्रेत वने आणि वनखाते यांच्यातील संबंध नकळत उमगून गेले, ते प्रेमाऐवजी पैशाचे, विकासा ऐवजी भ्रष्टाचाराचे आणि संवर्धनाऐवजी नाशाचे आहेत, जंगल आणि माणूस जिवंत राहायचा असेल तर असे संबंध फार दिवस राहणे तोट्याचे आहे आणि हा तोटा आज-मितीला भारतासारख्या विकसनशील देशाला परवडणारा नाही. प्रत्येक क्षेत्रात जेजे सार्वजनिक अथवा सरकारी ते फक्त आपलेच, ही विकृती नष्ट होत नाही तोपर्यंत ' हिरवा भारत ' हे केवळ स्वप्नच ठरणार आहे.

खाणे ही प्रवृत्ती आहे, एकट्याने खाणे ही विकृती आहे, पण आहे ते सर्वांनी खाणे ही सत्प्रवृत्ती आहे या अर्थाचे विनोबाजींचे सांगणे तुमच्या आमच्या आचरणात यायला हवे. नाहीतर हे असेच चालणार, जसे वनांचा विकास होण्याऐवजी केवळ वनकर्मचाऱ्यांचाच विकास होतो आहे, आदिवासींचा विकास होण्याऐवजी त्यांच्या विकास योजना राबविणाऱ्यांचाच विकास होतो आहे, धरणग्रस्तांचे योग्य पुनर्वसन होण्याऐवजी पुनर्वसन खात्यातील अधिकारी लोकच केवळ लालेलाल होतात; मला वाटते या गोष्टीची ही यादी इथेच थांबलेली बरी.



# जंगलतोड थांबविण्यास व्यक्तिगत सहभाग हवा

**शौनक कुलकर्णी**

---

आजकाल शहरातील लोकांत आणि विशेषतः उच्च मध्यमवर्गीय लोकांत बोंचसा, कॅक्टस किंवा शोभेची घरातील झाडे याचा झपाट्याने प्रसार होऊ लागला आहे.

त्याला कारण म्हणजे आधुनिकीकरण, कारखाने, मोठमोठ्या इमारती! त्यामुळे धडाधड नष्ट होणारे वृक्ष आणि या रुक्ष वातावरणात निसर्गाशी नाते जोडण्याचा हा काहीसा प्रयत्न असतो. खरे म्हणजे शहरात जगलतोडीची अनेक कारणे सांगता येतात पण खेड्यात काय? येथेही हा प्रश्न आहेच. ही बेछूट वृक्षतोड थांबवण्यासाठी आधार मिळाला आहे, तो वृक्ष लावण्याचा. सामाजिक वनीकरणाचा. तसेच 'एक मूल एक वृक्ष' अशा घोषणांचा! पण झाडे लावून त्याची होणारी तोड कशी भरून निघणार? मुख्य गरज वृक्ष जगवण्याची व वृक्षतोड थांबविण्याची आहे.

डिसेंबर महिन्यात पुणे विद्यापीठाच्या 'मानवशास्त्र' विभागातून अभ्याससहलीसाठी पुणे जिल्ह्यातील आंजनावळे या गावी आम्ही गेलो होतो. तेथील निसर्गसौंदर्य अगदी सहज दृष्ट लागावी असे आहे आणि खरोखरच या सौंदर्याला आता दृष्ट लागू लागली आहे. कारण सदाहरित असलेल्या या भागतील वृक्षसंपत्तीवर गदा आलेली आहे.

तेथील वनस्पतिसृष्टी ही सर्वसाधारणपणे मान्सूनजंगल प्रकाराखाली येते. विविध प्रकारची वनश्री येथे तग धरण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यात प्रामुख्याने वड, पिंपळ, औदुंबर, बोंकारा, उंबर, साहेर, आइन, हिरडा, बेहडा, दातपाडी, कोंवळ आंबा, जेल, पांगारा, बोंगडा, शिंगरी कुडा, पांढरी, आशिन, कदंब, जांभूळ, करवंद, साग, शिसव इत्यादी. त्यातही हिरडा, बेहडा, दातपाडी, औदुंबर करवंद यासारख्या प्रकारची झाडे आहेत. जवळजवळ एकूण झाडाच्या ५५ टक्के आहेत. तसेच या भागात बांबू पण आढळतो. पण बांबूची जाडी फार वाढत नाही. झाडावर दगडफूल हा प्रकार आढळतो. येथे पाऊस अधिक असल्याने महाबळेश्वर भागात दिसणारी ऑरचिडस येथे बऱ्याच प्रमाणात आढळतात. अर्थात सध्या हिवाळा असल्याने त्याचे प्रमाण वाढलेले असते.

ही बहुतेक वनश्री गावाबाहेर डोंगर उतरणीवर आहे. परंतु हरितक्रांतीसाठी अत्यंत उपयोगी ठरलेली वनस्पती सुबाभूळ मात्र येथे नाही. वास्तविक या झाडाचे फायदे बरेच आहेत. हे झाड एक तर लवकर वाढते. कमी पाण्याच्या जमिनीही ते तग धरू शकते. तसेच या वनस्पतीमुळे नायट्रोजनचे प्रमाणात वाढ होऊन त्याच्या स्थिरिकरणास मदत होते. या झाडाची पाने जनावरांना अत्यंत पोषक असून दूध उत्पादनातही त्यामुळे वाढ होते. या झाडाच्या लाकडाचा बांधकामासाठी उपयोग होऊ शकतो असा हा बहुगुणी वृक्ष शहरात सर्वत्र दिसत असला तरी या भागात आम्हाला एकही सुबाभूळ बघायला मिळाला नाही. आणि येथील लोकांनाही त्याबद्दल काहीही माहिती नाही. हेच 'सामाजिक वनीकरण' योजनेचे यश म्हणावे काय? वस्तुतः सुबाभूळ झाडे प्रशिक्षण भेट योजने अंतर्गत या गावातील लोकांना देऊन शेतातील बांधावर लावली जायला हवीत. त्यामुळे इतर फायद्यांबरोबरच मधुमक्षिका पालनाचा लघुउद्योग लोकांना करता येईल.

जंगलतोड ही सर्वत्र रंगात आलेली आहे. कारण बरीचशी जंगलाखालील जमीन गावातील काही मंडळींच्या मालकीची आहे व थोडी जमीन जंगल खात्याकडे आहे. जी जमीन खासगी मालकीची आहे तेथील जंगलतोडीवर कोणतेही नियंत्रण ठेवता येत नाही. कारण पैशाची गरज पडेल त्या प्रमाणे ही माणसे येईल त्या किंमतीला झाडे विकून टाकतात. त्याची किंमत ३०० रुपयांच्यावर सहसा येतच नाही. जंगलखात्याच्या ताब्यातील जंगलातही चोरून जंगलतोड चालूच असते. प्रत्यक्ष आम्ही जेव्हा जंगलात गेलो, तेव्हा जवळजवळ २०-२५ झाडांची तोंड प्रत्यक्ष चालू होती. इतकेच नव्हे तर पुढे लाकडाची भरलेली एक मालमोटारही आम्ही पाहिली. हे काम दररोज चालूच असते हे गावातील कित्येक लोकांकडून समजले. तसेच हे लाकूड शहरात येते हे सुद्धा आम्हाला सांगितले गेले. जोवर खासगी मालकीची झाडे तोडण्यासाठी आता लागू असलेला नियम अधिक कडक, त्याहीपेक्षा त्यावर अधिक कडक निर्बंध येत नाहीत, त्याची अंमलबजावणी केली जात नाही तोवर सरकारची वनीकरणाची योजना मूळ धरू शकणार नाही.

येथे होणाऱ्या जंगल तोडीचे येथील लोकांना निश्चित दुष्परिणाम भोगावे लागत असले तरीही त्याची तोड थांबविण्यास ही माणसे अजूनही तयार झालेली नाहीत. जंगलतोडीमुळे जमिनीची धूप चालू आहे. प्रत्यक्ष आंजनवळ्यातील पावसाचे प्रमाण कमी होत चालले आहे.

पालापाचोळा कमी झाल्याने नैसर्गिक खताची निर्मिती कमी होते. या जंगलातून हिरडा, बेहडा, यासारख्या औषधी वनस्पतीही सुटलेल्या नाहीत. या हिरड्याबेहड्याला दहा किलोमागे फक्त ६-७ रुपये मिळतात व त्याचे उत्पन्न आता कमी झालेले आहे. त्यामुळे अप्रत्यक्षपणे या लोकांची मिळकत कमी झाली आहे. आजकाल आयुर्वेदिक औषधांकडे लोकांचा कल दिसतो. पण त्याचा पुरवठा होणाऱ्या जंगलावर मात्र गदा आलेली आहे.

जंगलतोडीवर सर्वत्र जोरदार चर्चा होत आहे. त्याचे महत्त्वही सर्वांना पटलेले आहे. वृक्षारोपणाचे कार्यक्रम केले जात आहेत. परंतु काही मर्यादित स्वार्थामुळे त्या कार्यक्रमाला यश येत नाही आणि कार्यक्रमही अगदी औपचारिक स्वरूपाचे होत आहेत. प्रत्यक्षात लावलेली झाडे वाचविली जात नाहीत व आहेत ती टिकविली जात नाहीत. एकूण सर्व परिस्थिती कळते पण वळत नाही अशा स्वरूपाची आहे.

शिवाजी महाराजांनी आपल्या अधिकाऱ्यांना पत्र लिहून जंगलतोड न करण्यास सुचविले होते. कोणत्या प्रकारची झाडे कशी व किती प्रमाणात कापावी याचे भान ठेवण्याचे महाराजांनी स्वतः जातीने सांगितले होते. त्यावरून त्या काळातही त्यांनी जंगलाचे महत्त्व ओळखले होते हे समजते. मराठी संतकवी तुकाराम महाराजांनीही 'वृक्षवल्ली आम्हा सगे सोयरे' असे सांगितले आहे. पण आजची वनश्री वरोवरची मनुष्याची सोयरीक स्वार्थी आहे व माणसांनी दूरदृष्टी त्याबाबतीत अजियात ठेवलेली नाही.

आम्ही आंजनावळ्यास गेलो, राहिलो म्हणून आम्हाला जंगलतोडीबाबत थोडी तरी कल्पना आली. प्रत्यक्षात हा प्रश्न खरोखरीच देशव्यापी, भयानक असा आहे व त्याकडे आपले दुर्लक्ष होते आहे. या प्रश्नाकडे खरेच गांभीर्याने पाहयला हवे.

येथे गरज आहे ती जंगलतोडीवर अधिक कडक निर्बंध आणण्याची, त्याहीपेक्षा वृक्षांची काळजी घेणे हे सामाजिक कर्तव्य आहे याची भावना माणसाच्या मनात निर्माण होणे आवश्यक आहे. तरच प्रत्येकजण झाडे लावू शकेल. त्यावर वनमहोत्सव, रोपे वाटणे, किंवा विमानातून बिय टाकणे हा उपाय नाही. येथे प्रत्यक्ष व्यक्तींचा अंतर्भाव होणे आवश्यक आहे.

('केसरी' ६ फेब्रुवारी, १९८६ मधून साभार)

## परदेशी मदतीच्या सहकार्याने राबविले जाणारे भारतातील सामाजिक वनीकरण प्रकल्प

| राज्य | एकूण खर्च (डॉलर्स) (दशलक्षात) | अंदाजे परदेशी मदत (डॉलर्स) (दशलक्ष) | कालावधी | निधी संस्था | लागवडीचे क्षेत्र (हेक्टर्स) |
|---|---|---|---|---|---|
| उत्तर प्रदेश | ४० | २३ | १९७९–८४ | जागतिक बँक | ५२,६८० |
| गुजराथ | ६७ | ३७ | १९८०–८५ | " | १,०५,४४० |
| तामीळनाडू | ४७ | ३३ | १९८१–८६ | SIDA | — |
| मध्यप्रदेश | ४० | २५ | १९८१–८६ | USAID | १,००,००० |
| पश्चिम बंगाल | ३४ | २९ | १९८१–८७ | जागतिक बँक | ९३,००० |
| महाराष्ट्र | ५६ | ३० | १९८२–८७ | USAID | — |
| जम्मू आणि काश्मीर | २८ | १३ | १९८२–८७ | जागतिक बँक | ४४,००० |
| हरियाणा | ३३ | २० | १९८२–८७ | " | ६७,००० |
| कर्नाटक | ५५२ (रुपयात) | २७ | १९८३–८८ | जागतिक बँक/ODA | १,४९,००० |
| आंध्रप्रदेश | ४०० ( " ) | ४४ | १९८३–८८ | CIDA | १,३८,००० |
| ओरिसा | २३ | १८ | १९८३–८८ | SIDA | ५७,००० |
| केरळ | विचाराधीन | — | — | जागतिक बँक | — |
| बिहार | " | — | — | SIDA | — |

SIDA–Swedish International development Agency, USAID : Uuited states Agency for International, ODA–Overseas Development Administration (U. K.) (IDA) : canadian Internatinal Development Agency.

(दी स्टेट ऑफ इंडियाज एनव्हायर्नमेंट १९८४–८५, सिटीझन सेकंड रिपोर्ट पान ५५ वरून)

गुंतवून घेऊ शकेल.

वर वर्णन केलेली पद्धती रम्य कल्पनाविलास नसून ती वास्तवात अस्तित्वात आहे ज्या ठिकाणी स्थान बदलती शेती अस्तित्वात आहे अशा आदिवासी भागामध्ये अशी पद्धती राबविणे सहज शक्य होईल. अशा भागातील अनेक अर्थव्यवस्थेतील समस्या म्हणजे अशा भागामध्ये शेतीसाठी उपलब्ध तंत्रज्ञान जुनेच राहिले असून त्यावरील लोकसंख्येचा दबाव व गरजा मात्र वाढत आहेत. त्यामुळे एकाच जमिनीत दोनवेळा शेती करण्यातील अंतरही कमी कमी होत आहे. परिणामत: इतक्या कमी काळात त्या जमिनीत नैसर्गिक जंगल वाढण्याच्या शक्यता आता नष्ट झाल्या आहेत.

एका अर्थाने या लोकांना दुसरा मार्गही उपलब्ध नाही. ते एका दुष्ट चक्रातच सापडले आहेत. अशा भागामध्ये प्रत्येक कुटुंबाच्या वाट्याला येणाऱ्या जमिनीचे प्रमाण दरवर्षी कमी कमी होत चालले आहे. त्यामुळेच हजारो वर्षे उपयोगी पडत आलेले त्यांचे स्थान बदलत्या शेतीचे अर्थकारण आता दुर्बल होत चालले आहे. म्हणूनच जर अशा भागामध्ये वनसंवर्धन प्रकल्प राबवायचे ठरविले तर ज्यांना आज आपण मर्यादित साधनसामग्री समजत आहोत ती विस्तारित साधनसामग्रीत परावर्ती होईल. अर्थातच कोणत्या झाडांची लागवड करायची हे त्या त्या भागातील जमिनीच्या प्रकारावर व हवामानावर अवलंबून असेल.

वरील प्रतिकृतींच्या चौकटीत बसणारा असा एखादा वनसंवर्धन प्रकल्प घेतला तर लोकांनी त्यांची पारंपरिक स्थान बदलती शेतीची पद्धती संपूर्णपणे बंद करण्यास भाग पाडण्याची आवश्यकता राहणार नाही. कारण त्यांना ह्या नव्या परिस्थितीत निवडीचे स्वातंत्र्य असेल. जेथे अशी शेती त्यांना पूर्ण निर्वाहाचे साधन पुरवीत नाही तेथे ते वेगळे परंतु त्याच्या परंपरेशी संलग्न अशा नवीन उत्पन्न देणाऱ्या कार्यक्रमाकडे आकर्षित होऊ शकतील. मात्र हे नवीन प्रकल्प आणि त्यापासून निर्माण होणारी साधनसंपत्ती त्यांच्याच मालकीची असेल याची त्यांना खात्री द्यावी लागेल. लोक जसजसे वनसंवर्धन प्रकल्पांकडे आकर्षित होतील आणि त्यातील त्यांचा सहभाग जसजसा वाढेल तसतसे त्यांचे अधिकाधिक श्रम कारणी लागतील आणि त्यांच्या सध्याच्या उत्पन्नात देखील वाढ होईल. आज जाणवणारा स्थान बदलत्या शेतीवरील ताणही झपाट्याने कमी होईल. प्रथमत: स्थान बदलता शेती धारकाला आर्थिक दृष्ट्या दबवू नका त्याचे निवडीप्रमाणे त्याला वृक्षपट्ट्यावर अधिक श्रम गुंतवून अधिक उत्पन्न मिळवू द्या. त्याच प्रमाणे स्थान बदलत्या शेतीसाठी आज उपलब्ध असणारे मजूरही टप्याटप्याने कमी होतील तरीसुद्धा जर स्थान बदलत्या शेतीचे चक्र चालू राहिले तर एकच जमीन दोन वेळा कसण्याच्या काळात वाढ होईल आणि त्यामुळे त्या जमिनीतून येणारे उत्पन्नही वाढेल.

वनसंवर्धनाचा हा कार्यक्रम जसजसा चालू लागेल तसतसा अधिकाधिक कुटुंबांना आपले सर्व श्रम त्यात गुंतविण्यासाठी वाव निर्माण होईल व त्यांचे एकूण उत्पन्न वाढू लागेल. त्याहीपेक्षा अधिक म्हणजे जसजसा लोकांत आत्मविश्वास वाढू लागेल व जगण्यासाठीचे साधन म्हणून हा योग्य पर्याय आहे हे जेव्हा त्याला कळू लागेल तेव्हा स्थान बदलत्या शेतीपासून तो प्रवृत्त व्हायला तयार होईल. त्या प्रकारे ज्या प्रकारे वाढते लहान मूल हळूहळू आपल्या आईचे दूध सोडून इतर खाण्यापिण्याकडे वळते.

( वेस्टलँडस् न्यूज ह्या त्रैमासिक वार्तापत्रातील डॉ. बी. डी. शर्मा, आयुक्त, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती भारत सरकार यांचे मूळ इंग्रजी लेखाचा मराठी अनुवाद. )

---

पान ३१ वरून ]

काही हिस्सा शहादा रेंजरला मिळाला. परंतु मंदाणा वनपालाला काहीच मिळाले नाही. त्यामुळे पैसे देणाऱ्या लोकांनी शहादा येथील पत्रकार श्री. गिरधर पवार ( सहसंपादक सुजय साप्ताहिक ) यांच्याकडे लेखी निवेदन दिले. त्यांनी शहादा तहसिलदारांकडे तक्रार देऊन वनकर्मचाऱ्यांना पैसे देणाऱ्या ७४ लोकांचे लेखी निवेदन घेतले आणि श्री. गिरधर पवार यांनी ही पैशांची तक्रार खासदार श्री. माणिकराव गावित यांच्याकडे पाठविली आहे.

अशा प्रकारे शहादा वनखात्याचे रेंजर, वनपाल, वनरक्षक मिळून आदिवासींकडून हजारो रुपये लुटत आहेत. ज्यांनी पैसे दिले नाहीत त्यांना मार खावा लागतो. कधी दूर होईल हा अन्याय ? कुणी आवर घालेल का या वनखात्याला ?

पान ३५ वरून ]

वाघपाड्यातील भिल-पावरा लोकांनी सांगितले की एकाच गावठाणावर वेगवेगळ्या जात-भाषा असणाऱ्यांना वसविण्याने त्यांच्या समाजात फार मोठा प्रश्न निर्माण होईल.

भिल/पावरा समाजाच्या बायका पहिला नवरा सोडून दुसरा नवरा करू शकतात. जर का पुरुष जमिनीपासून वंचित केला गेला, घरापासून वंचित केला गेला तर त्याची बायको दुसरी सोयरीक करील. कारण नवऱ्याकडे उत्पादनाचे साधनच रहाणार नाही. गावे उद्ध्वस्त केल्याने येणारे हे संकट त्यांच्या दृष्टीने मोठे आहे.

वाघपाड्याच्या लोकांना तहसीलदाराने सांगितले की त्यांना कोडीद गावी वसविणार तर त्याला त्यांचा विरोध आहे. कारण कोडीद व वाघपाड्याचा पूर्वापार झगडा आहे. जर वाघपाड्यातील आदिवासी कोडीदला गेले तर प्रचंड झगडे झाल्याशिवाय राहाणार नाहीत. वाघपाड्यातील एक माणूस कोडीद गावी गेला. तेथे त्याने टपरी बांधली तर तेथील कामदाराने टपरी उठवण्यास त्यास भाग पाडल्याचे त्याने सांगितले. कायद्याप्रमाणे कामदारावर कारवाई करू असे प्रशासन म्हणेल. परंतु कायद्याचा पलीकडेही काही गोष्टी शिल्लक राहातात. त्याचा विचारच केला गेलेला नाही.

## गावावर खर्च केल्या गेलेल्या रकमेला जबाबदार कोण

या तोडल्या गेलेल्या गावात जिल्हापरिषदांच्या शाळा होत्या, वीज होती, धार्मिक-सामाजिक मंदिर होते, हॅन्डपंप-विहिरी होत्या, रस्ते होते. ही सारी विकासाची कामे ( शासनाच्या भाषेत ) या अनधिकृत गावात का केली गेली ? त्या विकास कामावर झालेला खर्च, गावे तोडल्यामुळे, मातीमोल झाला आहे. त्याला जबाबदार कोण ? जनतेच्या पैशाच्या झालेल्या या अपहाराबद्दल शासनाला गुन्हेगार का ठरवू नये ? त्यांनी केलेल्या गुन्ह्याबद्दल त्यांच्यावर खटले का भरू नयेत ?

## शिक्षणाची हेळसांड

गावे तोडली, शाळा तोडल्या. वर्ष अखेर ऐन परीक्षा तोंडावर आल्या असताना विद्यार्थी उघड्यावर पडला आहे. त्याला हे कळत नाही की त्याने कोणत्या ठिकाणी शाळेत जावे, त्याची परीक्षा केव्हा व कोण घेणार ? त्यांचे वर्ष फुकट जाणार आहे. तर शिक्षकांना काम उरलेले नाही. आता जिल्हापरिषदेने विभाग मुख्याध्यापकाला पाहाणी करण्यास सांगितले आहे की उठवलेली गावे कोठे गेलीत, शाळा घेणे कोठे शक्य आहे ?

## लोकांना नुकसान भरपाई द्यावी

डिसेंबरच्या सुरुवातीला गावे तोडली गेली. आज अडीच महिने झालेत. त्यांचे पुनर्वसन झालेले नाही. वन-अधिकारी म्हणताहेत की त्या लोकांना गावठाण जमिनीवर ते वसविणार आहेत. त्या ठिकाणी वीज, पाणी, शाळा, रस्ते, धर्म-स्थळे यांची सोय ते करून देतील.

त्यांना गावे तोडायची होती व त्या गावांना व्यवस्थित नियोजनासहित पुनः वसवायचे होते तर गावे तोडण्याआधी त्यांनी गावठाण जमिनीवर पट्टे पाडायचे होते, विकासाची कामे उभी करायची होता परंतु वन-खात्याने आधी नियोजन केले नाही, आदिवासी व त्यांच्यात काम करणाऱ्या संघटना यांना विश्वासात घेतले नाही, तडकाफडकी कारवाई केली व आदिवासींना उघड्यावर टाकले.

वन-खात्याचा या अमानुष कारवाईमुळे जे मानसिक, शारीरिक व आर्थिक नुकसान प्रत्येक व्यक्तीचे झाले आहे त्याची नुकसान भरपाई शासनाने दिलीच पाहिजे.

## निषेध सभा

वन-खात्याच्या या अमानुष कारवाईच्या निषेधात " मजूर संघर्ष वाहिनी " ने सांगवी या गावी निषेध सभा आयोजली होती शिरपूर तालुक्यात, मध्य प्रदेशाच्या हद्दीवर हे गाव वसले आहे.

निषेध सभा घेण्यात येऊ नये म्हणून जमावबंदी आदेश लागू करण्यात आला होता. तरी देखील ही सभा झाली. विविध संघटना व पक्ष प्रतिनिधींनी या सभेत उपस्थती लावली होती.

## प्रचंड मोर्चा

उद्ध्वस्त गावे त्याच जागी वसविण्यात यावीत या मागणीसाठी धुळे जिल्ह्याची " भूमिहीन हक्क संरक्षण समिती " स्थापन करण्यात आली आहे. या समितीतर्फे मागण्यांसाठी दि. २० फेब्रुवारी रोजी धुळे शहरात प्रचंड मोर्चा आयोजित करण्यात आला आहे.

▭

# आदिवासी एकता परिषद का व कशासाठी

**– विरसिंग पाडवी**

आदिवासी समाजाकडे नजर टाकली तर तो देशभर डोंगर, दऱ्याखोऱ्यात, वेगवेगळया विभागात, जंगलाच्या सान्निध्यात आपले पारंपरिक जीवन जगत असल्याचे दिसते. आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात इतर समाजाच्या तुलनेत मागासलेला आहे. सामाजिक दृष्टीनेही इतर समाजाच्या तुलनेततो त्याला दुय्यम स्थान दिले जाते. अर्थात याची मुळे इथल्या समाजव्यवस्थेत रुजलेली आहेत. आदिवासी समाज सामूहिक जीवन पद्धतीने जगणारा असल्याने, त्याच्या सामाजिक जीवन पद्धतीत निर्णय प्रक्रिया सामूहिक असून, मानवी मूल्ये जपून समानतेकडे वाटचाल करणारी अशी त्याची संस्कृती आहे. परंतु त्याचा आर्थिक विकास आणि शैक्षणिक प्रगती नसल्याने इतर समाजाच्या तुलनेत त्याचा राहणीमानाचा दर्जा उच्चप्रतीचा नाही. त्यामुळे त्याच्या सामाजिक जीवनातील आणि संस्कृतीतील चांगल्या मानवीमूल्यांकडे डोळसबुद्धीने कधी बघितले नाही. साहित्यात जे काही लिखाण आदिवासी समाजाबद्दल झाले तेही खुनी, दरोडेखोर, लुटारू, दारूडे, जंगलात राहणारे जंगली अशा प्रकारचे चित्र उभे केल्याने इतर समाजाचा आदिवासी समाजाकडे बघण्याचा दृष्टीकोन तिरस्कारणीय, अनादरयुक्त असा आहे. सवर्णांची जीवनाची काही अंगे सदोष आहेत, त्यांचे शुद्धीकरण झाले पाहिजे ह्याची काळजी कधी घेतलीच नाही. कारण जातीव्यवस्थेने दिलेला श्रेष्ठतेचा अहंकार न वळवण्यास कारणीभूत ठरला. देवाने दिलेली देणगी असल्यामुळे आम्ही श्रेष्ठ एवढेच सांगून मोकळे झाले. वर्षानुवर्षे धार्मिक आणि जातीव्यवस्थेच्या सिद्धांताच्या चौकटीत चकरा मारीत राहिले, एका सामाजिक सिद्धांताचे स्वरूप कधी झाले नाही. इतिहासाचार्य वि.का. राजवाडे म्हणत आमचे वंशज आर्य हे खरे जंगली होते. मग जंगलात राहणाऱ्या आदिवासींकडून जीवनोपयोगी काहीच नाही का? इतका आदिवासी समाजाबद्दल दुजाभाव का? असा प्रश्न उपस्थित होतो. इतिहासानेही ब्रिटीशांविरुद्ध लढणाऱ्या आदिवासी क्रांतिवीरांना कुठेच स्थान दिले नाही. इतिहासाचा शोध घेतला तर काय दिसते? ब्रिटिशांविरुद्ध पहिला उठाव करणारे आदिवासी होते ही वस्तुस्थिती आहे. खाज्या नाईक, उमाजी, तंट्या भिल, बिरसा मुंडा असे कितीतरी आदिवासी क्रांतीवीर ब्रिटिशांविरुद्ध लढले परंतु इथल्या इतिहासकारांनी त्यांची कुठेच दखल घेतली नाही. अगदी अलीकडील काळात गुजरांच्या अन्याय-अत्याचाराविरुद्ध उठाव करणाऱ्या शहाद्यातील अंबरसिंग महाराजावरही चोरीच्या आणि दरोडेखोरीच्या खोट्या केसेस करून त्याला बदनाम करण्याचा अनेक तऱ्हेने प्रयत्न केला गेला.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ४५ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभवही सुखद नाही. दरवर्षी आदिवासींच्या नावावर अनेक प्रकारच्या योजना आखून प्रचंड प्रमाणावर पैसा खर्च करण्यात येतो. परंतु आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीत आणि आर्थिक विकासात फारसा बदल दिसत नाही. चंद्रपूर, बस्तर आणि धुळे जिल्ह्यातील नर्मदाकाठावरील आदिवासींकडे नजर फेकली तर तेथे पक्के रस्ते

नाहीत. अशा ठिकाणी आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारी कुठलीही यंत्रणा जाऊ शकत नाही. रस्ते नसल्यामुळे दळणवळणाच्या साधना अभावी कोणत्याही योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही. आदिवासींच्या विकासासाठी आखण्यात आलेल्या योजनांची अंमलबजावणी करणारे प्रशासकीय अधिकारी अशा ठिकाणी जाण्यास नेहमी उदासीन असतात.

वरील परिस्थिती आदिवासींच्या वाट्याला का आली? ही परिस्थिती बदलेल कशी? आणि बदलेल तरी केव्हा? असा प्रश्न आदिवासी समाजाला पडल्यावाचून राहात नाही. याचा शोध घेतला तर काय दिसते? आर्य भारतात आल्यानंतर अगोदरच या भूमीवर वास्तव्य प्रस्थापित करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीने छळायला सुरुवात केली. आपले जीवन उध्वस्त करणाऱ्या आर्यांना ह्या जमातींनी प्रतिकार करण्यास सुरुवात केली. या परस्पर विरोधी प्रतिकारातून आर्य-अनार्य असा संघर्ष होऊन, आर्यांनी आदिवासी जमातींच्या कत्तली करण्यास सुरुवात केली. पराभूत आदिवासी जमाती डोंगर, दऱ्याखोऱ्यात पळाले ते पुन्हा बाहेर आलेच नाहीत. कारण आर्यांनी अशा प्रकारे वर्चस्व प्रस्थापित केल्यानंतर त्यांच्या समाजरचनेत वर्गावर आधारित चार्तुवर्णाची निर्मिती झाली. चार्तुवर्णातूनच जातीव्यवस्थेचा जन्म झाला. या जातीव्यवस्थेनुसार श्रेष्ठांची-ब्राह्मणांची पूजा हिंदू समाजातील इतरांनी करावी, केवळ हा उच्च पुरुष-ब्राह्मण व त्याचा वर्गच उत्तम जीवन जगण्यासाठी व इतरांवर शासन चालवण्यासाठी जन्माला आला असून त्याचे अन्य काही कर्तव्य नाही, त्यांना स्वत:साठी जगण्याचा अधिकार नाही व स्वत:चा व्यक्तिमत्वाचा विकास करण्याचा हक्कही नाही. अशा प्रकारचे तत्त्वज्ञान या जाती व्यवस्थेत ठेवल्यामुळे आदिवासी समाज त्याच्या अस्तित्वापासून अधिकाधिक दूर फेकला गेला.

कायद्याने जातीव्यवस्था नष्ट करण्यात आली आहे. घटनेने सर्वांना समानाधिकार दिले असून स्वत:च्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. परंतु प्रत्यक्ष अनुभवावरून काय दिसते? कायद्याने प्रदान केलेले हक्क आणि संधी - जसेच्या तसे सुरक्षित राहण्यासाठी कार्यक्षम अशी सामाजिक सद्सद्विवेक बुद्धी असेल, समाज जीवन पद्धतीत परस्परांबद्दल आदर आणि समानतेची भावना असेल तरच कायद्याने प्रदान केलेले हक्क आणि संधी लोकांना मिळू शकतात. दुर्दैवाने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुद्धा भारतीय समाज जीवनामध्ये वरील गुणांचा अभाव दिसून येतो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरसुद्धा जातीव्यवस्थेने निर्माण केलेल्या सामाजिक विषमतेचे शुद्धीकरण झाले नाही. एक वेळ आर्थिक विकासातील अंतराचा समेट घडवून आणणे तितके कठीण नाही, परंतु जातीव्यवस्थेने प्रदान केलेली श्रेष्ठतेची मानसिक विकृती नष्ट करणे अशक्य नसले तरी महाकठीण आहे.

वरील परिस्थितीतून आलेला अनुभव आणि अनेक वर्षापासून व्यक्तिगत पातळीवर मनात खदखदत असलेल्या विद्रोहाला, महाराष्ट्र व्यापी आदिवासींची बैठक, आदिवासी विकास भवन नासिक येथे होऊन सामूहिक रूप देण्यात आले. त्यातूनच आदिवासी एकता परिषदेची निर्मिती आणि स्थापना झाली. धुळे, नासिक, चंद्रपूर, ठाणे अशा निरनिराळ्या विभागातून प्रतिनिधी उपस्थित होते. हरीचंद्र चव्हाण, काळूराम धोदडे, वाहरू सोनवणे, सी.सी. राठवा, ए.टी. पवार, मा. आमदार हरीभाऊ महाले, खा. कहांडळे, प्रताप पवार, माधव बंडू

मोरे, पांढरे, डॉ. डग्ला, कुंवर, आदिवासी कवि भुजंग मेश्राम, आमदार नेताजी राजगडकर, समाज कल्याण मंत्री ना. मधुकर पिचड इ. नी आपापले विचार मांडले. बैठक उत्साहात पार पडली. आर्थिक, शैक्षणिक प्रश्नापुरती मर्यादित चळवळ न राहता आदिवासींचा स्वाभिमान आणि संस्कृती जपून आत्मसन्मानाची चळवळ उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

बैठकीत खालील ठराव एक मताने करण्यात आले.

१) परिषद प्राधान्याने आदिवासींच्या आत्मसन्मानात्मक लढे उभारण्यासाठी कटीबद्ध होत आहे.

२) आदिवासी समाजाला प्रबळ राजकीय शक्ती.म्हणून उभे करण्यासाठी प्रयत्न करणे.

३) आदिवासींचे राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक हक्कांसाठी कार्य करणे व आवश्यक वाटल्यास संघर्षात्मक लढे उभारणे.

४) प्राथमिक ते महाविद्यालयीन क्रमिक पाठ्यपुस्तकात आदिवासींच्या खऱ्या इतिहासाचा तसेच आदिवासी लेखक, कवि, यांच्या साहित्य कृतींचा समावेश करणे.

५) शासनाची विविध महामंडळे (उदा :- नियोजन मंडळ, महिला आर्थिक विकास मंडळ, साहित्य अणि संस्कृती मंडळ) यांचेवर आदिवासींचे प्रतिनिधी शासनाने घ्यावेत.

६) शिक्षण, जमीन व रोजगार हा आदिवासींचा हक्क म्हणून त्यांची कठोर अंमलबजावणी करावी.

७) आदिवासी विकास कार्यक्रमासाठी वार्षिक, आर्थिक योजनेत लोक- संख्येच्या प्रमाणात म्हणजे ९% निधीऐवजी आदिवासी जेवढ्या भू- भागावर राहतो तेवढी म्हणून १६% रक्कम देण्यात यावी.

८) नकली आदिवासी मोठ्या प्रमाणावर आदिवासींच्या सवलतीचा लाभ उठवत असल्याने नकली आदिवासींपासून खऱ्या आदिवासींचे संरक्षण करण्यासाठी सरकारने संवैधानिक उपाययोजना करावी.

● ● ●

क्या सर्दी-ज़ुकाम
आपको जकड़े रहता है?


झंडू फार्मास्युटिकल वर्क्स लि.,
गोखले रोड, दक्षिण दादर, बंबई ४०० ०२५.
पूरी जानकारी के लिए इस्तेमाल करने से पहले पैक पर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ लीजिए.

## एका आदिवासी युवतीच्या फसवणुकीची कहाणी

# "झिपरी"

– चुडाराम बल्हारपुरे

त्या गारड सायेबानं 'झिपरी'चा हात धरला तेव्हा झिपरी थोडीसी लाजली होती. लाजण्या - अगोदर तशी ती घाबरलीच होती. पण नंतर गारडसायेब काही रागावलाच नाही. तेव्हा धडधडत्या छातीने, तिरप्या नजरेने त्याच्याकडे पाहिल्यानंतर, गारड (गार्ड) आपल्याकडे पाहून हसत आहेत हे बघून झिपरी अगदी लाजून गेली होती; लाजाळूच्या पानासारखी आणि त्यानंतर काय झालं कोणास ठावूक, पण झिपरी एकदम त्या गार्डाच्या प्रेमात पडली. तिची भिती तर दूर निघून गेलीच, पण गार्ड मात्र तिला अगदी देवासारखा भासू लागला.

आज झिपरी अगदी आनंदात होती. कारण तो गार्ड आज तिला आपल्या सोबत घेवून जाणार होता; अगदी कायमचा, लग्न लावून, आपल्यासोबत लग्नाची बायको म्हणून ठेवण्याकरता. ती त्याच्याकरता स्वतःचा जीव ओवाळून टाकणार होती. जन्मभर त्याची सेवा करण्याची तिची तयारी होती. त्या दिवशी तो गार्ड म्हणाला होता–

"झिपरे..."

"काय गारडसायेब?"

"मी तुला घेवून जाणार आहे माझ्यासोबत."

"कुठं जी?" हृदय धडधडायला लागलं. तोंडातून बोल फुटेना.

"अशी घाबरतेस काय?"

"नाय जी. पर कुठं घेवून जाणार हायीसा?"

"अगं माझ्या घरी. माझी लग्नाची बायको म्हणून."

"पर..."

"आपलं लग्न झालं नाही ना? तू काही काळजी करू नकोस. मी येत्या पुनवेला तुझ्याशी लग्न लावतो. आणि तुला माझ्या घरी घेवून जातो."

आणि तेव्हापासून झिपरी खूष होती. गारडसाहेबांचा हा निरोप ऐकल्यापासून तर ती अधिकच वेडीपिशी झाली होती. काय करू अन् काय नको असं तिला होवून गेलं होतं. आणि ती मोठ्या आतुरतेने पुनवेची वाट पाहत होती. आणि आज "पौर्णिमेचा दिवस" होता.

झिपरी आज सकाळीच उठली होती. अंधारातच तिने सडासंमार्जन केलेला होता. अंगण अगदी आरशासारखं चकचकीत करून नंतर ती माठ घेवून जवळच्या ओढ्यावर पाण्याकरता गेली होती. आणि सोबतच आंघोळीकरता म्हणून एक धोतर घेतला होता. ओढ्यातील गार पाण्याने आंघोळ करताना काय शहारलं तिचं अंग! ती एकदम धुंद होवून गेली. आणि त्यातच तिला आठवला तो पहिला दिवस; ज्या दिवशी गार्डानं तिचा हात धरला होता...!

दिवस हळू-हळू वर येऊ लागला तसा "झिपरी"चा जीव खालीवर होऊ लागला. तिनं भराभर काड्यांची मोळी बांधली. तशी ती कोंबड्याच्या पहिल्या बांगेलाच जागी होवून या रानात आली होती. पण अंधारात एका भल्या